जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप२३-२४/शेतीशाळा/मा.सू./२०२३/ १०७३५

कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५
दिनांक: २६/०५/२०२३

प्रति,

१. विभागीय कृषी सहसंचालक (सर्व)

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

विषय: सन २०२३-२४ क्रॉपसॅप संलग्न शेतीशाळा कार्यक्रम अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांबाबत...

संदर्भ: १. आयुक्तालयाचे पत्र जा.क्र/वि.प्र.-७/शेतीशाळा/अग्रीम/२३७७/२०१९,दि.०८/११/२०१९

२.आयुक्तालयाचेपत्र जा.क्र/वि.प्र.-७/शेतीशाळा/अग्रिम विनियोग/२३९६/२०१९,दि.१५/११/२०१९

३. आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./वि.प्र.-७/ उ.शे.शा./पुरस्कार/ २०१९/९४९२,दि.१७/१२/२०१९

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०१९-२० पासून कापूस, सोयाबीन, भात, तूर, मका, ज्वारी, ऊस व हरभरा पिकांकरीता खरीप व रब्बी हंगामात क्रॉपसॅप, राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान, राष्ट्रीय खाद्य तेल अभियान, राज्यपुरस्कृत योजना, राष्ट्रीय कृषि विकास योजना, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) या योजनांच्या समन्वयातून एकत्रित स्वरुपात (Convergence) पिकनिहाय शेतीशाळा राबविण्यात येत आहेत. सदर कार्यक्रमाच्या अनुभवातून सन २०२३ -२४ मध्ये अधिक प्रभावीपणे शेतीशाळा राबवावयाच्या आहेत. संपूर्ण राज्यात शेतीशाळा कार्यक्रमाच्या एकसमानतेच्या दृष्टीने शेतीशाळा प्रमाणभूत पद्धती (Standard Operating Procedure (SoP), पिकनिहाय वर्ग व घ्यावयाचे विषय तसेच पिकनिहाय क्रॉपसॅप संलग्न शेतकरी शेतीशाळा आयोजनाच्या दृष्टीने मार्गदर्शक सुचना सोबत सहपत्रीत करण्यात आलेल्या आहेत.

सदर शेतीशाळा मार्गदर्शक सुचना कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असून त्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांपर्यंत वितरित होतील याची कृपया दक्षता घ्यावी. तसेच शेतीशाळा अंमलबजावणीचा मासिक अहवाल आयुक्तालयास नियमितपणे सादर करावा.

(दिलीप झेंडे)
संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत: माहितीस्तव

१. मा.प्रकल्प संचालक, पोक्रा, मुंबई

२. मा.संचालक आत्मा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. कृषी उपसंचालक विप्र-१/ विप्र-२/विप्र-३, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

## शेतकऱ्यांची शेतीशाळा मार्गदर्शक सूचना सन २०२३-२४

**प्रस्तावना-** राज्यामध्ये क्रॉपसॅप कार्यक्रम कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत अत्यंत चांगल्या पध्दतीने राबविण्यात येत आहे. कार्यपध्दतीमधील बदलामुळे कापूस पिकावरील गुलाबी बोंड अळीचा प्रभावी रितीने नियंत्रित करण्यात यश मिळाले आहे. तसेच क्रॉपसॅप कार्यक्रमामध्ये क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा सहभाग मोठया प्रमाणावर वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतावर क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या भेटी वाढून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किड व रोगांचा सल्ला प्रभावीपणे देण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांचा क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या प्रति विश्वास वाढून कृषि विभागाची प्रतिमा उंचावण्यात चांगला परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे विविधस्तरावरुन देण्यात आलेले कृषि तंत्रज्ञान तसेच विविध संदेश शेतक-यापर्यंत परिणामकारकपणे पोहोचविणे शक्य झाले आहे. त्यामध्ये विविध पिकासंदर्भात तांत्रिक मार्गदर्शनाची जोड मिळाल्याने त्याचा परिणाम उत्पन्न अनेक पटीने वाढण्यास मदत झाली आहे. या पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांपर्यंत नवीन कृषी तंत्रज्ञान पोहचविणे व सुधारीत कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी शेतकरी शेतीशाळा हे अत्यंत प्रभावी माध्यम मानून सन २०१९-२० ते २०२२-२३ मध्ये शेतीशाळा राबविण्यात आल्या. कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे प्रसार करण्यासाठी "शेतकरी शेतीशाळा" ही अत्यंत प्रभावी कृषी विस्तार पद्धती असून प्रकल्पाचा उद्धेश सफल करण्यासाठी मागील वर्षाप्रमाणेच याही वर्षात सर्व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सहभागाने सोयाबीन, कापूस, भात, तूर, मका, ज्वारी, ऊस व हरभरा या पिकांकरीता शेतकऱ्यांची शेतीशाळा कार्यक्रम राबवावयाचा आहे.

### शेतीशाळा: संकल्पना

शेतीशाळा म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्याच शेतात पिकांचा आणि शेतीपद्धतीचा अभ्यास करण्यास शिकवणे. शेतीसंदर्भात उद्भवणाऱ्या विविध समस्या व त्यावरील उपाय स्थानिक पातळीवरच शोधण्याचा प्रयत्न करणे, क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत समाविष्ट पिके तसेच राज्यातील इतर प्रमुख पिकांवर उद्भवणारे कीड व रोगांचा प्रादुर्भाव तसेच त्यांच्या नियंत्रणाच्या उपाययोजना यांच्याबद्दलची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहचविणे, सदर उपायांचा अवलंब करण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य शेतकऱ्यांना प्रदान करणे इ. या उद्देशाने शेतीशाळांचे आयोजन करणे महत्वाचे आहे. प्रयोगशील शेतकरी (Host farmer) व प्रक्षेत्र, शेतकऱ्यांचा गट, महिला गट, तंत्रज्ञान/अभ्यासक्रम (curriculum), प्रशिक्षण साहित्य आणि अत्यावश्यक निविष्ठा (Critical inputs) हे शेतीशाळेचे प्रमुख घटक आहेत.

### उद्देश-

- क्षेत्रीय स्तरावर पिकनिहाय नवीन तंत्रज्ञान व त्यासंबंधित कौशल्ये शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रत्येक कृषि सहाय्यकांकडे शेतीशाळांचे आयोजन होणे अत्यंत आवश्यक आहे.
- क्रॉपसॅप व शेतीशाळा यांची सांगड घालुन क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे ज्ञान, कौशल्ये व वेळ याचा सुयोग्य वापर करुन घेणे.
- कृषि विभागातील नियमित क्षेत्रीय कर्मचारी व क्षेत्रीय पातळीवर आत्मातंर्गत कार्यरत अेटीएम, बीटीएम, शेतकरी मित्र, आणि कृषि सखी आणि पोक्रा अंतर्गत कृषि ताई यांचा योग्य समन्वय साधून कृषि विस्तार कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे ग्रामपातळीपर्यंत एकत्रीतपणे राबविणे.
- पर्यावरणपूरक व हवामान अनुकूल अशा शाश्वत पीक उत्पादन पद्धतीस चालना देणे.
- सुधारीत व प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास शेतकऱ्यांना ऊद्युक्त करणे.

- प्रत्यक्ष कृतीतून शिक्षणाद्वारे पिकांवरील विविध किडी, रोग, त्यावरील मित्रकिटक व त्यांचे शेतीतील महत्व शेतकऱ्यांना पटवून देणे.
- संबंधित पिकाच्या मुल्यसाखळीची शेतकऱ्यांना माहिती तयार करून देणे.
- जमिनीतून व बियाण्याव्दारे पसरणारे रोग व किडींचा पिकावरील प्रार्दुभाव कमी करण्यासाठी बीजप्रक्रिया प्रात्यक्षिके राबविणे.
- पीक उत्पादन, प्रक्रीया व बाजारमुल्य संबंधीत शासकीय व खाजगी संस्था, संशोधन संस्था व शेतकरी यांच्यामध्ये समन्वय व संपर्क वाढविणे.
- शेतकरी व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची क्षमता वृद्धींगत करणे, त्यांच्यामध्ये खिलाडूवृत्ती वाढविणे, सुप्त गुणांना चालना देणे तसेच उत्साहाची भावना निर्माण करणे.
- क्रॉपसॅप संलग्न शेतीशाळेमध्ये सोयाबीन, कापूस, भात, तूर, मका, ज्वारी, ऊस व हरभरा या पिकांचे पेरणीपुर्व ते काढणी पश्चात तंत्रज्ञानाबाबत पिक वाढीच्या अवस्थेनुसार वर्ग निहाय मार्गदर्शन करुन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.

**१. विभागनिहाय शेतीशाळा घ्यावयाची पीके व वर्ग संख्या-**

कोकण विभाग : १) भात

नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर विभाग : १) भात २) कापूस ३) सोयाबीन ४) तूर ५) मका ६) ज्वारी ७) हरभरा ८)ऊस

छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती विभाग : वर नमूद केलेली सर्व पिके (भात सोडून)

**वर्ग संख्या**

| अ.क्र. | पिके | वर्ग संख्या |
|---|---|---|
| १ | भात | सहा वर्ग |
| २ | सोयाबीन | पाच वर्ग |
| ३ | कापूस | सहा वर्ग |
| ४ | तूर | सहा वर्ग |
| ५ | खरीप मका | पाच वर्ग |
| ६ | रब्बी मका | पाच वर्ग |
| ७ | रब्बी ज्वारी | पाच वर्ग |
| ८ | हरभरा | पाच वर्ग |
| ९ | ऊस | सहा वर्ग |

२. **शेतीशाळा प्रशिक्षण-**

क्रॉपसॅप अंतर्गत पिकांच्या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने शेतीशाळा आयोजनाकरीता टिओएफ पूर्व प्रशिक्षकांद्वारे कृषि सहाय्यकांकरीता एक दिवसीय शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावयाचे आहे. यासाठी प्रशिक्षण साहित्य सर्व क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. रु.३००/- प्रती प्रशिक्षणार्थी (प्रशिक्षण साहित्य व व्याख्यात्यांचे मानधन, वाहतूक व्यवस्था इत्यादीकरीता)

३. **शेतीशाळेचे आयोजन**

३.१ सन २०२३-२४ मध्ये कृषि सहाय्यकांकडे शेतीशाळेचे आयोजन करण्यात यावे. त्यानुसार कृषि सहाय्यकांच्या कार्यक्षेत्रातील एका गावाची निवड करावी व या गावात खरीप व रब्बी हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या भात, कापुस, सोयाबीन, तुर, हरभरा, मका, ऊस व ज्वारी या प्रमुख पिकांकरीता शेतकऱ्यांच्या शेतीशाळेचे आयोजन करण्यात यावे.

३.२ शेतीशाळेचे शेतकरी व क्षेत्र ठरवत असताना ज्या ठिकाणी विविध योजनेंतर्गत पिक प्रात्यक्षिके राबविण्यात येणार आहे असे क्षेत्र व शेतकरी निवडण्यात यावेत.

३.३ प्रत्येक शेतीशाळेसाठी गावामध्येच उपलब्धतेनुसार एक गट पिक प्रात्यक्षिक/आंतरपिक प्रात्यक्षिकाचे आयोजन करुन त्या ठिकाणी पिक हंगामामध्ये पिक वाढीच्या अवस्थेनुसार शेतीशाळा वर्गाचे आयोजन करावयाचे आहे, याच क्षेत्रावर क्रॉपसॅप योजनेंतर्गत नियमित प्लॉट निवडण्यात यावेत.

३.४ शेतीशाळेचे आयोजन करण्यात येणाऱ्या गावामध्ये एक गाव एक वाण ही संकल्पना शेतकऱ्यांमध्ये रुजवून त्यानुसार शेतीशाळेसाठी निवड केलेल्या पिकाच्या एकाच वाणाची पेरणी करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे.

३.५ शेतीशाळेचे आयोजन करतांना प्रति तालुका किमान ३३% महिला शेतीशाळा राबविण्यात याव्यात.

३.६ शेतीशाळेचे आयोजन करण्यात येणाऱ्या गावातील शेतकऱ्यांना जमिनीची आरोग्य पत्रिका अंतर्गत माती तपासणी करणे व त्यानुसार पिकाचे खत व्यवस्थापन करणे, पिकांवरील प्रमुख किड रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन करणे या बाबींचे महत्व स्पष्ट करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा शेतीशाळेतील सहभाग वाढवावा.

३.७ शेतीशाळेचे आयोजन करतांना शेतकऱ्यांना सुरूवातीपासूनच पीक स्पर्धा याबाबत माहिती द्यावी व शेतीशाळेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये पीक स्पर्धा आयोजीत करण्यात यावी. यातील उत्कृष्ट पीक घेणाऱ्या शेतकऱ्यास जिल्हा, विभाग तसेच राज्य स्तरावरील पीक स्पर्धेत सहभागी होण्यास प्रवृत्त करावे.

३.८ शेतीशाळेचे आयोजन करण्यात येणाऱ्या गावामध्ये बिजोत्पादनाचे महत्व विषद करून शेतीशाळेच्या माध्यमातून बिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात यावा.

३.९ मुग/उडीद या कमी कालावधीच्या पिकाच्या शेतीशाळांचे ४ वर्ग घेण्यात यावेत तसेच सदर शेतीशाळा ह्या विना अनुदानीत राबविण्यात याव्यात.

३.१० पोक्रा योजनेंतर्गत शेतीशाळांचे नियोजन असलेल्या जिल्ह्यांव्यतिरीक्त जिल्ह्यांमध्येच क्रॉपसॅप/रा.अ.सू.अ./आत्मा अंतर्गत शेतीशाळा राबविण्यात याव्यात.

## ४. गाव व प्रक्षेत्र निवड-

४.१ गाव हा घटक निश्चित करुन त्या क्षेत्रातील खरीप/रब्बी हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या क्रॉपसॅप अंतर्गत सामाविष्ठ पिकांपैकी एका प्रमुख पिकांची निश्चिती करावी.

४.२ प्रमुख पिक निवड करताना खरीप व रब्बी हंगामामध्ये त्या ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये पेरणी होणाऱ्या क्षेत्रापैकी ७० टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी होणाऱ्या प्रमुख पिकाचा समावेश करावा.

४.३ पोक्रा योजनेंतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या शेतीशाळा या पोक्रांतर्गत करार तत्वावरील कर्मचाऱ्यामार्फ़त आयोजित करण्यात येत असल्याने ती गावे वगळुन कार्यक्षेत्रातील इतर गावातून कृषि सहाय्यक यांनी शेतीशाळेचे आयोजन करावे.

४.४ **ज्या गावात शेतकऱ्यांच्या शेतावर शेतीशाळा घेण्यात येणार आहे, त्याच क्षेत्रावर विविध योजनेतून प्रात्याक्षिके घेण्यात यावीत व तेच क्षेत्र क्रॉपसॅप अंतर्गत निरीक्षणे घेण्याकरिता निवडण्यात यावीत व या क्षेत्रावर ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम देखील घेण्यात यावा.**

४.५ ज्या ठिकाणी शेतीशाळा घेण्यात येणार आहे तेथील प्रयोगशील शेतकरी व सहभागी शेतकऱ्याचा प्लॉट क्रॉपसॅप अंतर्गत सर्वेक्षणासाठी निवडण्यात यावा.

४.६ शेतकऱ्यांना प्रत्येक शेतीशाळा वर्गामध्ये प्रात्यक्षिक दाखवावयाचे असल्याने प्रयोगशील शेतकऱ्याचे प्रक्षेत्र जे गावापासून जवळ आणि शेतकऱ्यांना जाणे येणे सोयीचे व्हावे अशा ठिकाणी निवडावे. केवळ जाणे येणे सोयीचे नसल्याने शेतीशाळा वर्गामध्ये शेतकऱ्यांची उपस्थिती अपेक्षेप्रमाणे राहत नाही याची जाणीव ठेवून प्रक्षेत्राची निवड करावी.

४.७ विविध योजनेमधील प्रात्यक्षिके ज्या क्षेत्रावर राबविण्यात येणार आहेत त्याच क्षेत्रावर शेतीशाळा घेण्यात यावी.

४.८ शेतीशाळा प्लॉटवरील तंत्रज्ञानाचा तौलनिक अभ्यास करता यावा आणि शेतीशाळेतील शेतकऱ्यांना सदर तंत्रज्ञान अवलंब करण्याबाबत निर्णय घेता यावा यासाठी शेतीशाळा प्लॉट शेजारीच नियंत्रित प्लॉट असणे आवश्यक आहे. दोन्ही प्लॉटमधील जमिनीचा प्रकार सारखाच असावा. मात्र नियंत्रित प्लॉटमध्ये शेतकऱ्याने नेहमीच्या पद्धतीचा अवलंब चालू ठेवणे अभिप्रेत आहे.

४.९ शेतीशाळा प्लॉट धारकाकडे शेतीशाळा प्लॉटसाठी संरक्षित सिंचनाची सुविधा असणे अभिप्रेत आहे.

४.१० **शेतीशाळेचे आयोजन प्रामुख्याने कीड रोग प्रवण क्षेत्रात (HOTSPOT), निश्चित प्लॉट वर ( Fix plot) व विविध योजने अंतर्गत आयोजित केलेल्या प्रात्याक्षिकांच्या ठिकाणी प्राधान्याने करावे.**

## ५. अमंलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचना-

५.१ विविध योजनेतंर्गत उपलब्ध होणारी पीक प्रात्यक्षिके ही शेतीशाळेशी निगडीत राबवावीत व शेतीशाळेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना संबंधित योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रात्यक्षिकाचा लाभ द्यावा. तसेच केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांमध्ये उपलब्ध असलेल्या इतर बाबींचा लाभ प्राधान्याने त्यांना देण्यात यावा.

५.२ कृषि सहाय्यकाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील क्रॉपसॅप अंतर्गत निवड केलेल्या गावांमध्ये एका प्रमुख पिकासाठी नियमित प्लॉट निवडून शेतीशाळेचे आयोजन करावे व शक्यतो क्रॉपसॅप निरिक्षणाच्या दिवशी शेतीशाळा

प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करावे. प्रशिक्षकांच्या गरजेनुसार त्यांना क्रॉपसॅप अंतर्गत निवड केलेल्या फिक्स प्लॉट व्यतिरिक्त इतर प्लॉटवर शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करता येईल.

५.३ महिला कर्मचाऱ्यांनी महिला शेतकऱ्यांसाठी प्राधान्याने ३३ % शेतीशाळांचे आयोजन करावे. सदर शेतीशाळेमध्ये प्रयोगशील शेतकरी ( (Host farmer) आणि इतर शेतकरी (Guest farmer) या पूर्णतः महिला असाव्यात. गावामधील ज्या प्रगत महिला शेतकरी आहेत अशा महिला तसेच ज्यांच्या नावे शेती नाही अशा महिलाही उत्तम शेती करतात अशा महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांचेमार्फत महिला शेतीशाळा प्रभावीपणे राबवता येईल.

५.४ शेतीशाळेची अंमलबजाबणी करतांना आत्मातंर्गत कार्यरत अेटीएम, बीटीएम, शेतकरी मित्र, रिसोर्स बँक मधील शेतकरी, आणि कृषि सखी पोक्रा अंतर्गत कृषि ताई यांचा सहभाग घेणे अनिवार्य आहे तसेच जिल्हा परिषदेकडील कृषि विभागाचा देखिल समावेश करावा.

५.५ ज्या योजनांमध्ये शेतीशाळेसाठी नियमित तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे अशा शेतीशाळा यापूर्वी प्रशिक्षित केलेल्या शेतीशाळा तज्ञ प्रवर्तकांमार्फत आयोजित करण्यात याव्यात.

५.६ जेथे नियमित योजनेतून शेतीशाळा उपलब्ध होणार नाही अशा गावामध्ये कृषि सहाय्यकांमार्फत क्रॉपसॅप योजनेच्या तरतुदी मधून शेतीशाळा घेण्यात येईल.

५.७ शेतीशाळेसाठी शेतकऱ्यांची निवड करत असताना जो शेतकरी सर्व घटकांची स्वतः अमंलबजावणी करु शकेल अशाच शेतकऱ्याची निवड करावी.

५.८ **शेतीशाळेचे नियोजन करत असताना प्रति कृषि सहाय्यक एक शेतीशाळा येईल या प्रमाणे नियोजन करावे.**

५.९ **प्रत्येक शेतीशाळेसाठी शेतकरी व क्षेत्र निवड करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.**

५.९.१ विविध योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक क्षेत्रावरच शेतकऱ्यांचे प्रशिक्षण तथा शेतीशाळेचा वर्ग घ्यावयाचा असल्याने सदरचे क्षेत्र रस्त्यालगत असावे.

५.९.२ निवड करावयाचा लाभार्थी हा प्रगतशील इच्छुक शेतकरी असावा त्याने निश्चित करुन दिलेल्या सर्व बाबीची अमंलबजावणी स्वखर्चाने करावी.

५.९.३ शेतकऱ्याने स्वतः सर्व बाबींच्या नोंदी करुन ठेवाव्यात.

५.९.४ संबंधीत गावामध्ये निवड केलेल्या प्रात्यक्षिक क्षेत्रावर पीक हंगाम कालावधीत शेतीशाळेचे आयोजन करण्यात यावे. त्यासाठी पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार शेतीशाळा वर्गाचे आयोजन करावे.

५.९.५ शेतीशाळेतील प्रशिक्षण वर्गासाठी किमान २५ शेतकऱ्यांची निवड करावी. ही निवड करतांना महिला शेतकऱ्यांचा समावेश करावा. तसेच हे शेतकरी संपुर्ण शेतीशाळेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

५.१० शेतीशाळेतील प्रत्येक प्रशिक्षण वर्गाचा कालावधी किमान ४ तास ठेवावा. यामध्ये आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष डेमो तथा प्रशिक्षण या माध्यमातुन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण कृषि सहाय्यकाने संबंधित शेतकऱ्यांना द्यावे. तसेच त्या आठवड्यातील पिक परिस्थितीनुसार योग्य सल्ला व पिकावरील प्रमुख किड-रोगांची ओळख व त्यावरील उपाययोजना याबाबत माहिती द्यावी. याबरोबरच त्या त्या वेळेचे कृषि संदेश, योजनांची माहिती या शेतीशाळांच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना द्यावी.

५.११ शेतीशाळेत पिकपरिसंस्थेची निरिक्षणे घेताना आढळून आलेल्या कीड, रोग व मित्रकीटक यांच्या जीवनक्रमाचे हरबॅरिअम शीटवर संग्रहण करावे, जेणेकरून शेतकऱ्यांना कीड, रोग व मित्रकीटक यांच्या विविध जीवनक्रमाचे आकलन होईल.

५.१२ विविध मोहिमांच्या अनुषंगाने घेण्यात येणारा प्रशिक्षण कार्यक्रम शेतीशाळेच्या माध्यमातून राबविण्यात यावा.

५.१३ शेतीशाळेसाठी कार्यक्षेत्रात उपलब्ध असलेल्या ग्रामीण कृषि कार्यानुभव (RAWE) मधील कृषि पदवीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घेण्यात यावा.

५.१४ शेतीशाळा वर्गात कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्र/कृषि संशोधन केंद्र/कृषि महाविद्यालय येथील तज्ज्ञांना तंत्रज्ञानाबद्दल माहिती देण्यासाठी आमंत्रित करावे.

५.१५ शेतीशाळा वर्गाकरिता कृषि पुरस्कार प्राप्त मान्यवर, प्रगतशील शेतकरी व रिसोर्स शेतकरी, कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ यांच्या भेटीद्वारे सहभागी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात यावे.

५.१६ मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, उपविभागिय कृषि अधिकारी, यांनी प्रत्येक आठवड्यात किमान एका शेतीशाळेस अचानक भेट देऊन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करावे.

५.१७ **शेतीशाळेसाठी प्रयोगशील शेतकऱ्यांच्या जबाबदाऱ्या (होस्ट फार्मर- प्रयोगशील शेतकरी)**

५.१७.१ शेतीशाळा प्रक्षेत्रावर व नियंत्रित प्रक्षेत्रावर वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी, पिकाच्या पूर्ण कालावधी मध्ये केलेल्या खर्चाच्या नोंदी ठेवणे. (रेकॉर्ड नोंदवही)

५.१७.२ नियंत्रित प्रक्षेत्रावर शेतकऱ्याने नेहमीच्या पद्धतीचा/तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

५.१७.३ पिकाची विविध अवस्थेमध्ये निरीक्षणे घेणे, तंत्रज्ञानाच्या उपयोगीतेबाबत निष्कर्ष काढणे, प्रत्याभरण (Feedback) करणे.

५.१७.४ शेतीशाळा प्रक्षेत्रावर प्रत्येक वर्गासाठी निर्धारित केलेले शेतकरी (Guest Farmer) जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करणे.

५.१७.५ शेतीशाळेस भेट देणाऱ्या अधिकारी/शेतकरी यांना माहिती देऊन सहकार्य करणे.

५.१८ **शेतीशाळेद्वारे शेतकऱ्यापर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी खालील चार महत्वाचे टप्पे पाडलेले आहेत. (पिकनिहाय या टप्प्यांमध्ये वाढ होऊ शकते)**

१. **पेरणीपूर्व:** माती परिक्षण करणे, जमीन तयार करणे, समतल मशागत, जागच्या जागी पाणी मुरविण्याची (Insitu Moisture Conservation) व्यवस्था करणे, खरीप हंगामासाठी त्या पिकासाठी योग्य अशा पिक वाणाची निवड करणे, पेरणीपूर्व उगवण क्षमता तपासणे.

१ **अ. रोपवाटीका-** भात पिकासाठी

२. **पेरणीच्या वेळी:** बियाणे प्रक्रिया करणे, पेरणी पध्दती, रुंद सरी वरंबा पध्दती (BBF) चा वापर करणे, पट्टा पध्दतीने पेरणी करणे, विविध खतांचा पहिला हप्ता देणे, तण नियंत्रणासाठी तणनाशकाचा वापर यावर भर देण्यात येईल.

३. **पिक वाढीच्या अवस्था:** हा टप्पा दीर्घकाळासाठी असल्याने यामध्ये योग्य प्रकारे आंतर मशागत, तणव्यवस्थापन, किड व रोग नियंत्रण, अन्नद्रव्य व्यवस्थापन, पिकासाठी पाणी व्यवस्थापन यामध्ये जीवसंरक्षक सिंचनाचा अंतर्भाव राहील.

४. **काढणीच्या वेळी व काढणीत्तर व्यवस्थापन:** यामध्ये काढणीची योग्य वेळ व पध्दती, काढणीनंतर त्याला वाळविणे, सफासफाई करणे, ग्रेडींग करणे, योग्य पध्दतीने साठवणूक करणे तसेच काढणी पश्चात उत्पादीत मालावर प्रक्रीया करणे, संबंधित पिकांची मुल्यासाखळी इत्यादी बाबींचा समावेश राहील.

वर उल्लेख केलेल्या विविध टप्प्यामध्ये जे तंत्रज्ञान व कौशल्ये शेतकऱ्यापर्यंत पोहोचवयाचे आहे. त्यासाठी तांत्रिक साहित्य विभागीय स्तरावर तयार करण्यात यावे. जेणेकरुन विभागनिहाय पिकांसाठीची आवश्यकता विचारात घेऊन दर्जेदार तांत्रिक प्रचार साहित्य तयार करून हे सर्व तांत्रिक साहित्य शेतीशाळेचा पहिला वर्ग सुरु होण्यापूर्वीच कृषि सहाय्यकांपर्यंत प्रशिक्षणाद्वारे पोहोचेल याची दक्षता विभागीय कृषि सहसंचालक यांनी घेणे आवश्यक आहे.

**शेतीशाळेमध्ये अवलंब करावयाचे तंत्रज्ञान:**

पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी स्थानिक कृषी हवामान पद्धतीचा, स्थानिक पिक पद्धतीचा विचार करून प्रकल्प क्षेत्रातील प्रमुख पिकांसाठी कृषी विद्यापीठाने व राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांनी विकसित केलेले, National innovation in climate Resilient Agriculture (NICRA) या प्रकल्पामध्ये अवलंबलेले, प्रयोगशील शेतकऱ्यांनी अवलंबलेले आणि कृषी विज्ञान केंद्रांनी पडताळणी केलेले हवामान अनुकूल तंत्रज्ञान निश्चित करून त्याचा काटेकोरपणे अवलंब करण्यासाठी शेतीशाळेतील सहभागी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.

- हवामान अनुकूल वाणांचा अवलंब.
- समतल मशागत व पेरणी.
- आंतरपीक पद्धती
- आच्छादनाचा वापर
- हिरवळीच्या खताचा वापर
- एकात्मिक कीड व्यवस्थापन
- सूक्ष्म सिंचन
- संरक्षित सिंचन
- संरक्षित लागवड
- उपरोक्त तंत्रज्ञानाशिवाय स्थानिक पातळीवर कृषी विद्यापीठ/कृषी विज्ञान केंद्राच्या सल्ल्याने जे तंत्रज्ञान वातावरणातील बदलास अनुकूल ठरलेले आहे, असे ही तंत्रज्ञान शेतीशाळेमध्ये अवलंबण्यात यावे.
- एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी मृदा तपासणी अहवाल शेतीशाळेच्या पहिल्या वर्गामध्ये उपस्थित शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात यावा. कमतरता असलेल्या अन्नद्रव्यांचा शिफारशीनुसार खतांचा वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. आवश्यकतेनुसार जैविक व रासायनिक खते, सूक्ष्म मूलद्रव्ये आणि भूसुधारके (जिप्सम इ. ) यांचा वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे. खतांचा कार्यक्षम वापर व खत बचत करण्याच्या अनुषंगाने वापरावयाचे तंत्रज्ञान याबाबत शेतकऱ्यांना अवगत करावे.
- शेतीशाळा प्रक्षेत्रासाठी कृषी विभागाच्या जैविक कीड नियंत्रक प्रयोगशाळेकडून द्रवरूप जीवाणू खतांचा (महाएनपीके- Liquid Consortium) पुरवठा करण्यात यावा. यामध्ये नत्र स्थिरीकरण करणारे, स्फुरद विरघळविणारे व जस्त विरघळविणारे जीवाणू यापैकी कमीत कमी दोन किंवा अधिक जीवाणूंचा समावेश

असतो. सदर जैविक खतांची बीजप्रक्रिया केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन पिकांच्या उत्पादकतेत वाढ होते.

- हवामान बदलामुळे विविध कीडरोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने कीडनाशकांवरील खर्च वाढत चालला आहे. परिणामी पिकांच्या उत्पादन खर्चामध्ये वाढ होत आहे. शेतीशाळेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे महत्व पटवून देणे ही क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची प्रमुख जबाबदारी आहे.
- किडींच्या प्रादुर्भावाबाबत अचूक माहिती मिळण्यासाठी फेरोमन सापळ्यांचा वापर अनिवार्य आहे. यासाठी कृषी विद्यापीठांच्या शिफारशीनुसार शेतीशाळेतील प्रात्यक्षिक प्रक्षेत्रासाठी आवश्यक फेरोमन सापळ्यांचे नियोजन करण्यात यावे.
- शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेत तांत्रिक माहितीपर साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे. असे साहित्य कृषी विद्यापीठ/ कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांच्या तांत्रिक सल्ल्याने तयार करण्यात यावे.

**शेतीशाळांच्या अंमलबजावणीमध्ये अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या**

**६.१ कृषि सहाय्यक**

६.१.१ शेतीशाळा आयोजनाची जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यक यांची राहील व संबधित गावातील शेतकरी मित्र आयोजनामध्ये स्थानिक आवश्यक ती सर्व मदत उदा. शेतकरी एकत्रित करणे, बैठक व्यवस्था करणे इ. कामे करतील.

६.१.२ कृषि सहाय्यक यांनी गाव, क्षेत्र निवडीसाठी मुद्या क्र.४ मधील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

६.१.३ कृषि सहाय्यक हे शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे विभागीय कृषि सहसंचालक यांनी निश्चित केलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे आयोजन करतील, आवश्यकता भासल्यास शेतकऱ्यांच्या गरजा, स्थानिक परिस्थिती व पीक परिस्थितीनुसार किरकोळ बदल करतील.

६.१.४ पिकांच्या कालावधीत निर्धारित केलेल्या तसेच पिक वाढीच्या अवस्थेनुसार शेतीशाळांचे वर्ग आयोजित करावे.

६.१.५ शेतीशाळेसाठी निश्चित केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब प्रयोगशील शेतकरी (Host Farmer) आणि इतर सहभागी शेतकऱ्याकडून करून घेणे.

६.१.६ शेतीशाळेतील पिक कापणीच्या वेळी व्यक्तीशः उपस्थित राहून उत्पादनाच्या नोंदी घेणे.

६.१.७ प्रात्यक्षिक प्लॉट आणि नियंत्रित प्लॉट मधील निरीक्षणे आणि उत्पादनाच्या नोंदी घेणे.

६.१.८ शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाची यशोगाथा तयार करणे.

६.१.९ शेतीदिन साजरा करणे व त्यामध्ये सहभागी शेतकऱ्यांना अनुभव कथन करण्यास प्रवृत्त करणे.

६.१.१० शेतीशाळा ॲप तयार होईपर्यंत गुगल स्प्रेडशीटवर शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे प्रत्यक्ष ठिकाण, वेळ व अहवालाची नोंदणी करण्याची जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यक यांची राहील.

६.१.११ शेतीशाळा आयोजनासाठी आवश्यक सुविधा, स्टेशनरी, अल्पोपहार व्यवस्था इ. बाबांची व्यवस्था करून घेणे.

६.१.१२ कृषि सहाय्यक यांनी राबविण्यात येणाऱ्या शेतीशाळेचे सविस्तर नियोजन हंगाम सुरु होण्यापूर्वीच तालुका कृषि अधिकारी यांना द्यावे.

## ६.२ कृषि पर्यवेक्षक

६.२.१ कृषि पर्यवेक्षक यांनी कार्यक्षेत्रातील सर्व शेतीशाळांना भेट देणे व पर्यवेक्षण करणे अनिवार्य आहे.

६.२.२ कृषि सहाय्यक यांनी शेतीशाळा ॲप तयार होईपर्यंत गुगल स्प्रेडशीटवर शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे प्रत्यक्ष ठिकाण, वेळ व अहवालाची नोंदणी केली आहे कि नाही याचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी संबंधित कृषि पर्यवेक्षक यांची राहील.

६.२.३ कृषि सहाय्यक यांनी राबविण्यात येणाऱ्या शेतीशाळेचे सविस्तर नियोजन हंगाम सुरु होण्यापूर्वीच तालुका कृषि अधिकारी यांना मध्ये विहित वेळेत प्राप्त होईल याचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी कृषि पर्यवेक्षक यांची राहील.

६.२.४ शेतीशाळेला भेट देण्याकरिता शास्त्रज्ञ, वरिष्ठ अधिकारी , रिसोर्स बँकेचे शेतकरी यांच्याशी संपर्क करून त्यांच्या भेटी निश्चित करणे.

६.२.५ कृषि पर्यवेक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रशिक्षण देण्याची क्षमता असलेल्या अनुभवी प्रगतशिल शेतकरी, रिसोर्स शेतकरी तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची यादी तयार करुन आवश्यकतेनुसार त्यांच्या सेवा शेतीशाळा प्रशिक्षण वर्गासाठी घेण्याचे नियोजन करावे.

६.२.६ कृषि पर्यवेक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषि सहाय्यक यांच्या शेतीशाळेस वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करावे. तसेच पुर्ण हंगामात त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतीशाळांचा अंर्तभाव होईल अशा रीतीने मंडळातील सर्व शेतीशाळा भेटीचे नियोजन करावे.

६.२.७ **कृषि पर्यवेक्षकांनी प्रत्येक आठवड्याला आपल्या अधिनस्त एकूण शेतीशाळांपैकी किमान २ शेतीशाळा प्रशिक्षण वर्गास भेट देऊन पर्यवेक्षण करणे अनिवार्य राहील. तसेच सदर पर्यवेक्षण व भेटीचा अहवाल अनुक्रमे परिशिष्ठ “क” व “ड” मध्ये सादर करावा.**

६.२.८ कृषि सहाय्यक यांना तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून अग्रिम प्राप्त झाल्याची खात्री करणे तसेच कृषि सहाय्यक यांनी अग्रीम मधून करण्यात येणाऱ्या खर्चाच्या नोंदी नोंदवहीत घेतल्याची शहानिशा कृषि पर्यवेक्षक यांनी करावी.

## ६.३ मंडळ कृषि अधिकारी

६.३.१ मंडळातील शेतीशाळांच्या आयोजनासाठी पीक, गाव व वार निश्चित करणे.

६.३.२ मंडळ कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील कृषि सहाय्यक यांच्या शेतीशाळेस वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करावे. तसेच पुर्ण हंगामात मंडळातील सर्व शेतीशाळांचा अंर्तभाव होईल अशा रीतीने मंडळातील सर्व शेतीशाळा भेटीचे नियोजन करावे. मंडळ कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील सर्व शेतीशाळांना भेट देणे अनिवार्य आहे.

६.३.३ मंडळाच्या कार्यक्षेत्रातील प्रशिक्षण देण्याची क्षमता असलेल्या अनुभवी प्रगतशिल शेतकरी, रिसोर्स शेतकरी तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची यादी तयार करुन आवश्यकतेनुसार त्यांच्या सेवा शेतीशाळा प्रशिक्षण वर्गासाठी घेण्याचे नियोजन करावे.

६.३.४ शेतीशाळेसाठी आवश्यक साहित्य बाबी कृषि सहाय्यक यांना उपलब्ध करुन देणे.

६.३.५ मंडळ कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील कृषि सहाय्यक यांनी राबविलेल्या शेतीशाळांचे विश्लेषणात्मक अहवाल प्राप्त करून त्याबाबतचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा.

६.३.६ शेतीशाळेला भेट देण्याकरिता शास्त्रज्ञ, वरिष्ठ अधिकारी , रिसोर्स बँकेचे शेतकरी यांच्याशी संपर्क करून त्यांच्या भेटी निश्चित करणे.

६.३.७ शेतीशाळेच्या अंमलबजावणी नंतर प्रभावी ठरलेल्या तंत्रज्ञानाचा अहवाल तयार करणे.

६.३.८ **मंडळ कृषी अधिकाऱ्यांनी आपल्या मंडळातील अधिनस्त कृषी पर्यवेक्षक यांच्या कार्यक्षेत्रामध्ये चालू असलेल्या किमान एका शेतीशाळेला पूर्ण हंगामात प्रत्येक आठवड्यास भेट देणे अनिवार्य राहील. त्यांनी आपल्या अधिनस्त प्रत्येक कृषि पर्यवेक्षक च्या कार्यक्षेत्रातील एका शेतीशाळेला भेटीं होतील अशा प्रकारे नियोजन करून पर्यवेक्षण करणे अनिवार्य राहील. तसेच सदर पर्यवेक्षण व भेटीचा अहवाल अनुक्रमे परिशिष्ठ "क" व "ड" मध्ये सादर करावा.**

## ६.४ तालुका कृषि अधिकारी

६.४.१ **तालुका कृषि अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील अधिनस्त मंडळातील चालू असलेल्या किमान एका शेतीशाळेला प्रत्येक महिन्यात एकदा भेट देऊन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणे अनिवार्य राहील. तसेच सदर पर्यवेक्षण व भेटीचा अहवाल अनुक्रमे परिशिष्ठ "क" व "ड" मध्ये सादर करावा.**

६.४.२ तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व मंडळातील कार्यरत कृषी सहाय्यक यांच्याकडून हंगामपूर्व शेतीशाळांचे पीकनिहाय नियोजन घ्यावे.

६.४.३ **तालुका कृषि अधिकारी यांनी शेतीशाळेसाठी लागणाऱ्या प्रशिक्षण साहित्याची खरेदी करीता कृषि सहाय्यक यांना अग्रीम वेळेत देणे. कोणत्याही परिस्थितीत सदरील साहित्याची एकत्रित खरेदी तालुका स्तरावरून करण्यात येऊ नये त्याबाबतचा अग्रिम कृषि सहाय्यक यांना उपलब्ध करून देण्यात यावा.**

६.४.४ क्षेत्रिय कर्मचाऱ्यांनी खर्च करुन सादर केलेली देयके वेळेत RTGS ने त्वरीत कृषि सहाय्यक यांना अदा करणेबाबतची कार्यवाही करावी.

६.४.५ तालुका कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील कृषि सहाय्यक यांनी राबविलेल्या शेतीशाळांचे. जिल्हास्तरावरून निवड करून दिलेल्या कृषि विज्ञान केंद्र यांच्याद्वारे मूल्यमापन करून त्याबाबतचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा.

६.४.६ तालुकास्तरावरील शेतीशाळा प्रवर्तक व कृषी सहाय्यक यांच्यामध्ये समन्वय राखणे.

६.४.७ तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यात राबविल्या जाणाऱ्या शेतीशाळांचे सविस्तर नियोजन हंगाम सुरु होण्यापूर्वीच घ्यावे.

## ६.५ उपविभागिय कृषि अधिकारी

६.५.१ उपविभागातील सर्व शेतीशाळांच्या होस्ट फार्मर शेतकऱ्यांना हंगामाच्या सुरुवातीस कार्यशाळा घेऊन त्यांना शेतीशाळेची संकल्पना समजावून सांगणे.

६.५.२ **उपविभागिय कृषि अधिकारी यांनी उपविभागातील प्रत्येक महिन्यात अधिनस्त तालुक्यातील किमान एका शेतीशाळेला किमान एकदा भेट देऊन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणे तसेच सदर पर्यवेक्षण व भेटीचा अहवाल अनुक्रमे परिशिष्ठ “क” व “ड” मध्ये सादर करावा.**

६.५.३ उपविभागिय कृषि अधिकारी यांनी शेतीशाळेसाठी लागणारे सर्व तांत्रिक साहित्याचा पुरवठा सॉफ्ट कॉपीद्वारे करणे.

६.५.४ अधिनस्त तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मदतीने प्रशिक्षण साहित्य निर्माण करणे उदा. किडी व मित्र किडींचे सॉफ्ट टॉइज, रेखाचित्र, मॉडेल इ.

६.५.५ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांना कृषि विज्ञान केंद्र, कृषि विद्यापिठातील शास्त्रज्ञांच्या भेटीचे आयोजन करुन तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे. शेतीशाळेमध्ये अवलंब करण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानास व्यापक प्रसिद्धी देणे.

६.५.६ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांसाठी विविध योजनांतून प्राप्त निधीच्या खर्चाचा नियमितपणे आढावा घेणे तसेच, क्षेत्रिय कर्मचारी यांनी स्वखर्चाने केलेल्या खर्चाच्या प्रतिपुर्तीची देयके वेळेत पारित करण्याबाबतचे सनियंत्रण करणे.

६.५.७ कार्यक्षेत्रातील यशस्वीपणे राबविण्यात येत असलेल्या शेतीशाळांची दृक-श्राव्य स्वरुपातील माहिती तज्ञांच्या मदतीने वेळोवेळी सामाजिक माध्यमाव्दारे प्रसिध्द करणे.

६.५.८ प्रयोगशील शेतकऱ्यास (Host farmer) त्याच्या भूमिका व जबाबदाऱ्या समजावून सांगणे.

६.५.९ शेतीशाळा आयोजनासाठी आवश्यक सुविधा, स्टेशनरी, अल्पोपहार व्यवस्था इ. बाबींची व्यवस्था करून देणे.

६.६ जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

६.६.१ **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रत्येक महिन्यात आपल्या जिल्हयातील किमान प्रति महिना एक शेतीशाळांना सर्व तालुक्यातून समप्रमाणात किमान एकदा अचानक भेट देऊन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणे तसेच सदर पर्यवेक्षण व भेटीचा अहवाल अनुक्रमे परिशिष्ठ “क” व “ड” मध्ये सादर करावा.**

६.६.२ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांसाठी वेगवेगळया निधीतून देण्यात आलेले अनुदान नियमितपणे खर्चाचा आढावा घेऊन क्षेत्रिय कर्मचारी यांनी स्वखर्चाने केलेल्या बाबींची प्रतिपुर्ती देयके त्वरीत पारित करण्याबाबतचे सनियंत्रण करणे.

६.६.३ जिल्ह्यातील सर्व कृषि सहाय्यक तसेच शेतकरी मित्र यांना शेतीशाळेसंदर्भात प्रशिक्षण देण्याचे नियोजन करावे.

६.६.४ **जिल्ह्यांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शेती शाळेचे मूल्यमापन करण्यासाठी जिल्हास्तरावर कृषि विज्ञान केंद्राची निवड करावी व त्यांच्याकडून सर्व शेतीशाळांचे मूल्यमापन करून प्रपत्र “अ” मध्ये सहपत्रीत केल्याप्रमाणे करावे.**

६.६.५ **यावरील नियंत्रणाची जबाबदारी आपल्या अधिनस्त कृषि उपसंचालक यांच्या कडे देण्यात येत आहे.**

## ६.७ विभागिय कृषि सहसंचालक

६.७.१ कार्यक्षेत्रातील शेतीशाळांची कृषि सहाय्यकनिहाय गावे व पीके निश्चित करणे.

६.७.२ विभागामध्ये राबविल्या जाणाऱ्या शेतीशाळांचे कृषि हवामान निहाय, पीक निहाय वेळापत्रक व प्रशिक्षण विषयक गरजा व तांत्रिक माहिती निश्चित करुन सुसुत्रता आणणे.

६.७.३ विभागातील पीक निहाय, गाव निहाय शेतीशाळांचा आराखडा तयार करुन नियोजन करावे.

६.७.४ विभागातील तालुका निहाय उत्पादन वाढीची सुत्रे निश्चित करुन त्याचा प्रशिक्षण वर्गात समावेश करणे.

६.७.५ जिल्हानिहाय तज्ञ प्रशिक्षकांचा चमु निवडणे व सर्व तालुक्यातून निवडक अधिकारी/कर्मचाऱ्यांना शेतीशाळाविषयक प्रशिक्षण वर्ग विभागस्तरावर आयोजित करणे.

६.७.६ विभागातील सर्व जिल्हयातील कमीत कमी एका शेतीशाळेस हंगामात अचानक भेट देऊन मार्गदर्शन व पर्यवेक्षण करणे तसेच सदर पर्यवेक्षण व भेटीचा अहवाल अनुक्रमे परिशिष्ठ "क" व "ड" मध्ये सादर करावा.

६.७.७ मंडळ कृषि अधिकारी ते विभागिय कृषि सहसंचालक यांचेकडे किमान एका शेतीशाळेचे पालक अधिकारी म्हणुन जबाबदारी राहील व त्यासाठी सदर शेतीशाळेच्या प्रत्येक प्रशिक्षण वर्गास त्यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन करावे. शेतीशाळेच्या भेटीदरम्यान शेतीशाळा प्रशिक्षण वर्गाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी मंडळ कृषि अधिकारी ते विभागिय कृषि सहसंचालक या सर्वांची राहील.

## ६.८ आयुक्तालय स्तर

६.८.१ विविध योजनेंतर्गत उपलब्ध शेतकरी प्रशिक्षण तसेच नियमित शेतीशाळा यांची तरतूद विचारात घेऊन शेतीशाळांचे लक्षांक निश्चित करणे व ते क्षेत्रीय स्तरावर कळवणे.

६.८.२ विभाग स्तरावरून योजनानिहाय, पीकनिहाय शेतीशाळांचे नियोजन मागविणे व ते अंतिम करणे.

६.८.३ आयुक्तालयस्तरावर राज्यात राबविल्या जाणाऱ्या सर्व शेतीशाळांचे सनियंत्रण करणे व वेळोवेळी आढावा घेण्याची जबाबदारी राहील.

६.८.४ आयुक्तालय स्तरावरील संबंधित योजनेच्या कृषि उपसंचालक यांनी विविध योजनेंतर्गत राबविण्यात आलेल्या शेतीशाळांना भेटी देऊन मासिक प्रगती अहवाल व शेतीशाळांची कृषि सहाय्यक निहाय यादी प्राप्त करून घ्यावी.

## ६.९ शेतीशाळा प्रशिक्षकासाठी प्रशिक्षण संच-

शेतीशाळा वर्गामध्ये प्रशिक्षक आणि शेतकरी यांना निरीक्षणे घेण्यासाठी (AESA) आणि सदर शिक्षणपद्धती परिणामकारक होण्यासाठी काही प्रशिक्षण साहित्याची आवश्यकता असते. यासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची उदा. रजिस्टर, फुटपट्टी, कोरे व ड्रॉइंग कागद, स्केच पेन सेट, १०X भिंग, लहान व्हायल्स इत्यादींची तसेच ट्रॅप्स, ल्युर्सची उपलब्धता शेतीशाळा प्रशिक्षण वर्ग सुरु होण्यापुर्वी (हंगामपुर्व) करणे आवश्यक आहे. ट्रॅप्स, ल्युर्सच्या उपलब्धतेबाबत तालुका कृषि अधिकारी यांनी स्वत: लक्ष घालावे. **सदरचे प्रशिक्षण साहित्याची खरेदी स्वत: कृषि सहाय्यक यांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत तालुका स्तरावरून साहित्याची एकत्रित खरेदी करण्यात येऊ नये.** प्रशिक्षण साहित्य या बाबी अंतर्गत सदरचा खर्च करण्यात यावा. यासाठी कृषि सहाय्यक यांना अग्रीम देण्यात यावा.

क्षेत्रिय कर्मचाऱ्यांकरीता आवश्यक प्रशिक्षण साहित्य शेतीशाळा प्रमाणभूत माहिती संच (SoP) पीक व वर्गनिहाय शेतीशाळा विषयवार माहिती देण्यात यावी.

### ६.१० शेतीशाळेतील पिकांच्या उत्पादनाच्या नोंदी-

शेतकरी शेतीशाळेच्या माध्यमातून पीकासंदर्भातील सर्व बाबींच्या माहितीद्वारे उत्पादन/उत्पन्न वाढीबाबत प्रशिक्षण वर्गात मार्गदर्शन करावे. तसेच शेतकऱ्यांना हंगामातील पीकांचे उत्पादन खर्च काढण्यासाठी प्रवृत्त करावे. यामध्ये रोजंदारीच्या मनुष्यबळ व बैल शक्तीचा वापर, यंत्राचा वापर, बी-बियाणे, सेंद्रिय व रासायनिक खते, जलसिंचन, पीक संरक्षण, खेळत्या भांडवलावरील व्याज हा प्रत्यक्ष तर जमिनीचा खंड व घसारा, कुटुंबातील मनुष्यबळ मजुरी इ. बाबींवरील खर्च हा अप्रत्यक्ष ठरतो. त्यानुषंगाने या सर्व बाबींवरील खर्चाचा विचार पीक उत्पादन खर्च काढताना करावा. पीक उत्पादन खर्च काढण्याकरीता नोंदवही ठेवणे बाबत शेतकऱ्यांना प्रवृत्त करावे.

### ६.११ शेतीदिन-

शेतीशाळेमध्ये अवलंब केलेल्या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रचार करणेसाठी प्रत्येक गावसमूहामध्ये पीक वाढीच्या शेवटच्या टप्प्यात एक दिवसीय शेतीदिनाचे आयोजन करावे. यासाठी कृषि विद्यापीठ/कृषि विज्ञान केंद्र/कृषि संशोधन केंद्र /कृषि महाविद्यालय येथील तज्ञांना तंत्रज्ञानाबद्दल माहिती देण्यासाठी आमंत्रित करावे. कृषि पुरस्कार प्राप्त मान्यवर तसेच गतवर्षीच्या शेतीशाळेमधील शेतकऱ्यांना आमंत्रित करून त्यांच्या अनुभवांचे अदान प्रदान करावे. शेतीदिनामध्ये किमान ५० टक्के महिलांचा सहभाग होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी. शेतीदिनामध्ये शेतीशाळेतील प्रशिक्षणार्थींना त्यांचे अनुभव कथन करण्यास प्रवृत्त करावे तसेच कोणते तंत्रज्ञान जास्त उपयुक्त ठरले याबाबत चर्चा घडवून आणावी. शेतीदिनासाठी प्रती शेतीशाळा निर्धारित केलेला निधी गावसमूह स्तरावर एकत्रित करून विहित वित्तिय नियमानुसार खर्च करण्यात यावा.

### ६.१२ उत्कृष्ट शेतीशाळा आयोजन स्पर्धा.

**उत्कृष्ट शेतीशाळा स्पर्धा आयोजित केल्याने कर्मचाऱ्यामध्ये खिलाडू वृत्ती वाढुन त्यांच्यामधील सुप्त गुणांना चालना देण्याच्या उद्देशाने जिल्हा व विभाग स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात यावे.** उत्कृष्ट शेतीशाळा स्पर्धा आयोजित केल्याने कर्मचाऱ्यामध्ये उत्साहाची भावना निर्माण होऊन योजनेचा उद्देश सफल होण्यास मदत होते. त्यादृष्टीने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील स्पर्धेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या कृषि सहाय्यक यांना आवाहन करुन त्यांचे अर्ज शेतीशाळेच्या हंगामाचे नियोजन करतेवेळी मागविण्यात यावे. जेणेकरून ज्या कृषि सहाय्यकांनी उत्कृष्ट शेतीशाळा स्पर्धेसाठी अर्ज केला आहे त्यांच्या शेतीशाळांना वरिष्ठांच्या जाणीवपूर्वक भेटी देऊन सनियंत्रण करता येईल.

उपविभाग निहाय प्राप्त अर्जांची छाननी करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक, तंत्र अधिकारी व लेखाधिकारी यांचे पथकामार्फत संबधित शेतीशाळांचे मुल्यांकन करावे. जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या कृषि सहाय्यक यांचे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकासाठी गुणांकन करावे. विभागस्तरावर विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली विभागिय सांख्यिक, तंत्र अधिकारी, कृषि अधिकारी यांचे चमू मार्फत अधिनस्त जिल्ह्यातील प्रथम मानांकित शेतीशाळांचे मुल्यांकन करुन विभागपातळीवर कृषि सहाय्यक यांचे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक निश्चित करावे. या नुसार जिल्हा व विभाग स्तरावर प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या कृषि सहाय्यक यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात यावे. **शेतकऱ्यांची शेतीशाळा कार्यक्रमांतर्गत प्रशस्तीपत्रकासाठी आवश्यक निधी क्रॉपसॅप व विविध योजनांमधील प्रशासकीय निधीमधून खर्च करण्यात यावा.**

उत्कृष्ट शेतीशाळा स्पर्धेच्या अंमलबजावणीसाठी आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./वि.प्र.-७/ उ.शे.शा./पुरस्कार/ २०१९/९४९२,दि.१७/१२/१९ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सविस्तर मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र.६ शेतीशाळा पुरस्कार कालबद्ध कार्यक्रमानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

**६.१३ शेतकरी शेतीशाळेसाठी निधीची तरतूद-**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान, राष्ट्रीय खाद्य तेल अभियान, राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत भात बियाणे साखळी विकास कार्यक्रम, आत्मा या योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. प्राधान्याने केंद्र शासनाकडुन प्राप्त निधी प्रथम वापरण्याचे नियोजन करावे. तद्नंतरच शेतीशाळा राबवण्यासाठी कमी पडणारा निधी क्रॉपसॅप या राज्य योजनेतून वापरण्यात यावा. **क्रॉपसॅप अंतर्गत शेतीशाळेसाठी उपलब्ध करून दिलेला निधी हा केवळ क्रॉपसॅप अंतर्गत समाविष्ठ आठ पिकांसाठीच वापरण्यात यावा.** सदर निधी प्रकल्पांतर्गत सामाविष्ठ पिकांव्यतिरीक्त इतर पिकांच्या शेतीशाळेसाठी खर्च केल्यास सदर खर्च अमान्य राहील. विविध योजनेच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या शेतीशाळेसाठी खालील ६.१४ मधील आर्थिक मापदंड वापरण्यात यावा. केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनातंर्गत शेतकरी प्रशिक्षणासाठी ही तरतुद उपलब्ध आहे. शेतीशाळेसाठीची तरतुद खालील मापदंडाप्रमाणे खर्च करावी.

**६.१४ शेतकऱ्यांची शेतीशाळा बाबीसाठी खर्चाचे मापदंड-**

| क्रॉपसॅप संलग्न शेतकरी शेतीशाळा | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | उपक्रम/ बाब | युनिट | मापदंड (रु) | शेरा |
| १ | प्रशिक्षण साहित्य व इतर तांत्रिक साहित्य | प्रती शेतकरी २००/- रुपये | ५००० | कृषि सहाय्यक यांना अग्रिम प्रतिपूर्ती करावी. |
| २ | शेतीशाळेतील २५ विद्यार्थी शेतकऱ्यांसाठी चहा पान नाश्ता यासाठी प्रति विद्यार्थी २० /- प्रमाणे व इतर सोयी सुविधा खर्च<br>पाच /सहा शेतीशाळा वर्गासाठी | रु. ५०० /- प्रती वर्ग | २५०० किंवा ३००० | कृषि सहाय्यक यांना प्रतिपूर्ती करावी. |
| ३ | शेती दिन खर्च | -- | २००० | कृषि सहाय्यक यांना प्रतिपूर्ती करावी. |
| ४ | विश्लेषणात्मक अहवाल तयार करणे. | -- | १००० | प्रपत्र“ब” मध्ये सादर करण्यात यावा. |
| ५ | कृषि विज्ञान केंद्र यांच्याद्वारे मुल्यमापन | -- | १००० | हा खर्च जिल्हा स्तरावर होणार आहे त्यामुळे अग्रिम प्रतिपूर्ती अपेक्षित नाही. |
| ६ | व्याख्यात्याचे मानधन:-प्रती व्याख्याता प्रती वर्ग रु.५००/-व्याख्याता सह घ्यावयाच्या वर्गाची अधिकतम संख्या २ व्याख्याते कोण असावेत हे मंडळ कृषि अधिकारी अथवा त्याहून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठरवावे.(कृषि विभागांतर्गत कर्मचारी/अधिकारी हे व्याख्याते असल्यास हि रक्कम देय राहणार नाही.) | रु. ५०० /- प्रती वर्ग | १००० | |

**टीप - परिशिष्ट “इ” प्रमाणे पीक निहाय आर्थिक मापदंडानुसार शेतीशाळा राबवायच्या आहेत .**

**कृषि विज्ञान केंद्राद्वारे मूल्यमापन या बाबीवरील खर्च जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या स्तरावर करावयाचा आहे.** शेतीशाळेसाठी निवड केलेल्या सुविधाकार शेतक-यास अल्पोपहार, बैठक व्यवस्था व इतर सोयीसुविधांसाठी लागणारा खर्च देण्यात यावा. सदर रक्कम शेतक-यास कृषि सहाय्यक यांना दिलेल्या अग्रीम मधून अदा करून शेतक-याची पावती घ्यावी. तसेच प्रशिक्षण साहित्य या बाबी अंतर्गतचा खर्च देखिल अग्रीम मधून करण्यात यावा. **कृषि सहाय्यक यांना दयावयाच्या अग्रिमाबाबत आयुक्तालयाचे पत्र जा.क्र/वि.प्र.-७/शेतीशाळा/अग्रिम/ २३७७/२०१९,दि.०८/११/१९ व जा.क्र/ वि.प्र.-७/शेतीशाळा/अग्रिम विनियोग/ २३९६/२०१९,दि.१५/११/२०१९ यानुसार कार्यवाही करुन कृषि सहाय्यक यांना निधीची उपलब्धता करण्यात यावी.**

प्रत्येक कृषि सहाय्यक यांना दिलेल्या अग्रीम मधून करण्यात येणारा खर्च खालील प्रमाणे खर्चाच्या नोंद वहीत नोंदविणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीत घेण्यात आलेल्या खर्चाची नोंद ही मंडळ कृषि अधिकारी यांनी तपासून स्वाक्षांकित करणे आवश्यक आहे.

### ६.१५ खर्चाची नोंद वही-

| अ.क्र. | कृषि सहाय्यकांचे नाव व सजा | शेतीशाळेचे गाव | शेतीशाळेस प्राप्त अग्रीम (रु.) | अग्रीम मिळाल्याचा दिनांक | प्राप्त अग्रीम मधून खर्च रक्कम (रु.) | | | शिल्लक रक्कम (रु.) | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | बाब | खर्च रक्कम (रु.) | दिनांक | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

### ६.१६ शेतकरी शेतीशाळा सनियंत्रण व अभिलेख

शेतीशाळा सनियंत्रण करतांना तसेच अभिलेखामध्ये नोंदी घेतांना पुढील मुद्दे निहाय नोंदी घेण्यात याव्यात. यामध्ये उत्पादनात झालेली वाढ, उत्पादन खर्चात झालेली बचत, उत्पादनाचा सुधारलेला दर्जा, प्रतवारी, प्रक्रियेमुळे मिळालेला बाजारभाव, बाजारमुल्य साखळीमध्ये सामिल झालेल्या शेतकऱ्यांची संख्या व सुधारीत पीक वाढीचे तंत्रज्ञान अवलंब केलेल्या शेतकऱ्यांची संख्या याचा समावेश करावा. शेतीशाळा बाब राबविताना अवलंबलेली कार्यपद्धती मार्गदर्शक सूचनांनुसार आहे किंवा कसे याबाबतची माहिती घेण्यासाठी रँडम पद्धतीने शेतकऱ्यांची निवड करून आवश्यक माहिती संकलित करण्यात यावी. जिल्हास्तरावरून कृषि विज्ञान केंद्राची निवड करून त्यांच्याद्वारे शेतीशाळांचे मुल्यमापन करण्यात यावे.

कृषि सहायक यांनी शेतीशाळा पुर्ण झाल्यानंतर शेतीशाळेचा विश्लेषणात्मक अहवाल तयार करून कार्यालयास सादर करावा. विश्लेषणात्मक अहवालाची तपासणी करून सदर अहवालाबाबतचे प्रमाणपत्र तालुक्याने जिल्हयास व जिल्हयाने विभागास सादर करावे. कृषी विभागातील तालुका कृषी अधिकाऱ्यापासून ते विभागीय कृषी सहसंचालक पर्यंत सर्वांनी शेतीशाळांना भेटी देऊन मार्गदर्शन करावयाचे आहे.

### ६.१७ शेतकरी शेतीशाळेसाठीचे लक्षांक

विविध योजनेंतर्गत प्रशिक्षण, प्रात्यक्षिके व शेतीशाळा या घटकांखाली शेतीशाळा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येते. आयुक्तालयाने दिलेल्या योजना निहाय लक्षांकामध्ये पुर्वपरवानगी शिवाय बदल करता येणार नाही. एकुण लक्षांकापैकी हंगाम निहाय शेतीशाळांचे विभागस्तरावर वाटप करावे किंवा खरीप हंगामामध्ये

राबविण्यात येणा-या शेतीशाळांमधुन शिल्लक शेतीशाळा रब्बी हंगामात राबविण्यात याव्यात. लक्षांकापेक्षा जास्त शेतीशाळा राबविण्यात आल्यास सदर शेतीशाळा विनाअनुदानीत ग्राह्य धरण्यात येतील. अतिरीक्त शेतीशाळांसाठी निधी उपलब्ध होणार नाही.

(दिलीप झेंडे)
संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

परिशिष्ठ "अ"

राबविण्यात आलेल्या शेतीशाळांचा तपशील

जिल्हा-                                                  तालुका -

| अ .क्र. | मंडळ | कृषि सहाय्यक /कृषि पर्यवेक्षक | पिक | शेतीशाळाची संख्या | शेतीशाळा घेण्यात येणाऱ्या गावाचे नाव | होस्ट फार्मर नाव | होस्ट फार्मर भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**टीप**- एका शेतीशाळेची माहिती एका आडव्या ओळी (row )मध्ये भरण्यात यावी.

## शेतीशाळा मासिक अहवाल- परिशिष्ठ “ब”

**शेतीशाळा अहवाल**

१) दिनांक ------------ अखेर पर्यंत नियोजित व प्रत्यक्ष आयोजित केलेल्या शेतीशाळेचा गोषवारा

**कृषि सहाय्यक**

दिनांक: ---------------- निवडा

| विभाग | जिल्हा | तालूका | पीक | नियोजीत शेतीशाळा संख्या | आयोजीत शेतीशाळा संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

२) दिनांक ------------ अखेरपर्यंत नियोजीत व प्रत्यक्ष आयोजीत केलेल्या शेतीशाळेचा सविस्तर तपशील

**कृषि सहाय्यक**

दिनांक: ---------------- निवडा

| तालुका | कृषि सहाय्यक मुख्यालय | कृषि सहाय्यक नाव | पीक | शेतीशाळा वर्ग क्र. | नियोजीत दिनांक | आयोजीत दिनांक | विषय | विशेषज्ञ (वक्ता) नाव | उपस्थित अधिकारी पदनाम | उपस्थित शेतकरी संख्या | फोटो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## शेतीशाळा पर्यवेक्षण अहवाल-परिशिष्ठ “क”

शेतीशाळा पर्यवेक्षण अहवाल- हंगाम - खरीप/ रब्बी

दिनांक-

| अनु. क्र. | विभाग | जिल्हा | पर्यवेक्षण अधिकारी | | भेटीचा दिनांक | कृषी सहाय्यक | | | भेट दिलेल्या शेतीशाळेचा तपशील | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नाव | पदनाम | | नाव | पदनाम | मुख्यालय | गाव | पिक | शेतीशाळेचा वर्ग क्र. | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

टीप- महिला शेतीशाळांचा पर्यवेक्षणामध्ये समावेश करण्यात यावा.

## शेतीशाळा भेटींचा तपशील -परिशिष्ठ "ड"

हंगाम -खरीप/रब्बी

अहवाल कालावधी-

| पर्यवेक्षण अधिकारी तपशील | | | पर्यवेक्षण अधिकारी यांच्या शेतीशाळा भेटींचा हंगाम निहाय लक्षांक | शेतीशाळा भेटींचा तपशील | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मागील आठवड्यापर्यंत साध्य | चालू आठवड्यातील साध्य | एकुण साध्य | |
| नाव | पदनाम | मुख्यालय | | | | | |
| | | | | | | | |

परिशिष्ठ “इ”

क्रॉपसॅप संलग्न शेतकरी शेतीशाळा २०२२-२३

| अ. क्र. | पिक | वर्ग संख्या | बाब निहाय तरतूद (रु.) | | | | | | एकुण तरतूद (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रशिक्षण साहित्य व इतर तांत्रिक साहित्य (प्रती शेतकरी रु. २००/-) | अल्पोपहार व इतर सोयी सुविधा खर्च (रु.५००/- प्रती वर्ग) | शेती दिन | रिसोर्स शेतकरी २ वर्गांसाठी (रु. ५००/- प्रती वर्ग) | विश्लेषणात्मक अहवाल | कृषि विज्ञान केंद्र यांच्या द्वारे मूल्यमापन | |
| १ | कापूस | ६ | ५००० | ३००० | २००० | १००० | १००० | १००० | १३००० |
| २ | भात | ६ | ५००० | ३००० | २००० | १००० | १००० | १००० | १३००० |
| ३ | तूर | ६ | ५००० | ३००० | २००० | १००० | १००० | १००० | १३००० |
| ४ | ख. मका | ५ | ५००० | २५०० | २००० | १००० | १००० | १००० | १२५०० |
| ५ | र. मका | ५ | ५००० | २५०० | २००० | १००० | १००० | १००० | १२५०० |
| ६ | र. ज्वारी | ५ | ५००० | २५०० | २००० | १००० | १००० | १००० | १२५०० |
| ७ | ऊस | ६ | ५००० | ३००० | २००० | १००० | १००० | १००० | १३००० |
| ८ | सोयाबीन | ५ | ५००० | २५०० | २००० | १००० | १००० | १००० | १२५०० |
| ९ | हरभरा | ५ | ५००० | २५०० | २००० | १००० | १००० | १००० | १२५०० |

# प्रपत्र "अ"

## शेतकऱ्यांची शेतीशाळा मुल्यमापन

जिल्हा- तालुका- गाव-

मूल्यमापन करणाऱ्याचे नाव- पदनाम-

मुल्यमापन करणाऱ्या संस्थेचे नाव -

| अ.क्र | बाब | तपशिल |
|---|---|---|
| अ | **शेतीशाळेसाठी गाव, पीक, व संपर्क शेतकरी निवड करणे** | |
| १ | गाव व संपर्क शेतकरी निवड | योग्य आहे /नाही |
| २ | पिक व बियाण्याची निवड | योग्य आहे /नाही |
| ३ | माती परीक्षण केले आहे | होय/नाही |
| ४ | पेरणी पूर्व शेतीशाळा वर्ग घेतला आहे. | होय/नाही |
| ५ | पेरणी पूर्व बियाण्यास बिजप्रक्रिया केली आहे | होय/नाही |
| ६ | शेतीशाळेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना पीक प्रात्यक्षिकाचा लाभ देण्यात आला आहे | होय/नाही |
| ७ | शेतीशाळेसाठी निवडलेल्या प्लॉट मध्ये सिंचन सुविधा उपलब्ध आहेत. | होय/नाही |
| ८ | संपर्क शेतकऱ्याची शेतीशाळा प्लॉटमध्ये आधुनिक तंत्रज्ञान राबविण्याची क्षमता आहे. | होय/नाही |
| ब | **शेतीशाळा अंमलबजावणी** | |
| १ | शेतीशाळा प्लॉट वरील तंत्रज्ञानाचा तौलोनिक अभ्यासाकरिता नियंत्रित प्लॉटची निवड केली आहे. | होय/नाही |
| २ | प्रशिक्षण साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे | होय/नाही |
| ३ | पीक वाढीच्या अवस्थेनुसार वर्ग घेण्यात आले आहेत | होय/नाही |
| ४ | शेतीशाळेत नाविन्यपूर्ण विषय घेण्यात आले आहेत | होय/नाही |
| ५ | शेती शाळेस तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले आहे तज्ञ मार्गदर्शक संख्या | होय/नाही |
| ६ | सहभागी शेतकऱ्यांना मित्रकिटक,शत्रू किटक ओळखता येतात | होय/नाही |
| ७ | सहभागी शेतकऱ्यांना किडींची आर्थिक नुकसान पातळी काढता येते. | होय/नाही |
| ८ | शेतकऱ्यांना जैविक औषधे/खते वापराबाबत उद्युक्त केले आहे | होय/नाही |
| ९ | शेती शाळेत घेतलेल्या विशेष विषय /लघु अभ्यास/लघु प्रयोग संख्या (घेतलेल्या विषयाची यादी व पूरक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे) | होय/नाही |
| १० | शेती शाळेत शासकीय योजनांची माहिती देण्यात आली आहे | होय/नाही |

## प्रपत्र “ब”
## शेतकऱ्यांची शेतीशाळा विश्लेषणात्मक अहवालाचे स्वरूप

जिल्हा: तालुका: मंडळ:

शेतीशाळेचे गाव:

शेतीशाळा राबविणाऱ्या कृषि सहाय्यकाचे नाव:

मुख्यालय:

| अ.क्र. | बाब |
|---|---|
| अ. | **शेतीशाळा निवडीचे निकष करणे**<br>(खाली नमुद करण्यात आलेल्या प्रत्येक बाबीचे सविस्तर वर्णन करावे.)<br>१. गाव -<br>2. पीक -<br>3. संपर्क शेतकरी -<br>4. क्षेत्र -<br>५. सहभागी शेतकरी -<br>६. नियंत्रित प्लॉटची निवड |
| ब. | **शेतीशाळा पेरणी पुर्व तयारी व प्रत्यक्ष पेरणी / लागवड**<br>(खाली नमुद करण्यात आलेल्या प्रत्येक बाबीचे सविस्तर वर्णन करावे.)<br>१. माती परीक्षण<br>२. बियाण्याची निवड<br>३. बीजप्रक्रीया<br>४. पेरणी पद्ध्त<br>५. सिंचन पद्ध्त<br>६. इतर नाविण्य पुर्ण बाब राबविण्यात आलेली नमुद करावी |
| क. | **पीक उत्पादन वाढीच्या अवस्थेनुसार शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात आलेले तंत्रज्ञान**<br>(खाली नमुद करण्यात आलेल्या प्रत्येक बाबीचे सविस्तर वर्णन करावे.)<br>१. पाणी व्यवस्थापन |

| | |
|---|---|
| | २. तण व्यवस्थापन<br>३. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन<br>४. एकात्मिक कीडरोग व्यवस्थापन<br>५. इतर नाविण्य पुर्ण बाबीचा अवलंब करण्यात आलेला आल्यास नमुद करावे |
| ड. | **पीक उत्पादनाचा तपशील:**<br>**( यामध्ये शेतीशाळा प्लॉट व नियंत्रीत प्लॅटचा सविस्तर तपशिल द्यावा)**<br>१. पीक उत्पादन खर्च - शेतीशाळा प्लॉट रु.प्रती एकर<br>नियंत्रीत प्लॉट रु. प्रती एकर<br>२. उत्पादकता - शेतीशाळा प्लॉट रु.प्रती एकर<br>नियंत्रीत प्लॉट रु. प्रती एकर<br>३. सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी /अधिक उत्पादकतेची कारणे<br>४. शेतीदिनाची माहीती थोडक्यात नमुद करावी |
| इ | **सर्वसाधारण माहीती.**<br>१. प्रशिक्षण साहित्याची माहीती<br>२. शेतीशाळेत घेतलेल्या विशेष विषय/लघु अभ्यास/ लघु प्रयोगाची यादी व थोडक्यात माहीती फोटोसह<br>३. शेतीशाळेस मार्गदर्शन केलेल्या तज्ञ मार्गदर्शकांची यादी व थोडक्यात माहीती (वर्ग निहाय द्यावी)<br>४. शेतीशाळेतील वर्ग निहाय उपस्थित शेतकऱ्यांची माहीती<br>५. शेतीशाळा वर्गास भेट दिलेल्या कृषि विभागातील अधिकारी, कृषि विभागा व्यतिरक्त इतर अधिकारी/पदाधिकारी, रिसोर्स शेतकरी / प्रगतशिल शेतकरी यांची यादी व संबधीतांनी नोंदविलेले अभिप्राय याबाबतची माहीती.<br>६. शेतीशाळेत सहभागी शेतकऱ्यांचे शेतीशाळेविषयीचे अभिप्राय |

ठिकाण :----------- कृषि सहाय्यकाची स्वाक्षरी/-

नावः-----------------------

दिनांक: / /२०२ मुख्यालय: ------------------

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

### शेतीशाळा प्रमाणभूत पद्धती (स्टॅन्डर्ड ऑपरेटींग प्रोसिजर (SoP))

**शेतीशाळा वर्गाचे वेळापत्रक :** प्रत्येक प्रवर्तकाने शेतीशाळेच्या ठरलेल्या दिवसाच्या आधीच्या दिवशी कार्डशीट वर खालील प्रमाणे वेळापत्रक लिहावे व ते शेतीशाळेमध्ये शेतकऱ्यांसमोर सादर करावे.

गावाचे नाव :-

शेतीशाळा वर्ग क्रमांक :- दि.:- / / २०

**आजचे कार्यक्रम**

| | |
|---|---|
| ८.०० | स्वागत/ शेतीशाळा प्रतिज्ञा |
| ८.१० | कार्यक्रमाची रुपरेषा |
| ८.१५ | मागोवा |
| ८.२० | पीक परीसंस्था निरीक्षणे व कीटक संग्रहालय तयार करणे |
| ९.२० | पीक परीसंस्था निरीक्षणांचे चित्रीकरण, सादरीकरण व चर्चा |
| १०.२० | समुह गुणदर्शन |
| १०.४५ | अल्पोपहार |
| ११.०० | विशेष अभ्यास/ लघू अभ्यास / लघू प्रयोग |
| १२.०० | मुल्यमापन/ समारोप |

१. **स्वागत/ शेतीशाळा प्रतिज्ञा:** उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे स्वागत करुन खालीलप्रमाणे सर्व उपस्थितांनी शेतीशाळा प्रतिज्ञा घ्यावी व शेवटी आयसीएम टाळी वाजावी.

**शेतीशाळा प्रतिज्ञा:** शेती हा माझा व्यवसाय आहे. सारे शेतकरी हे माझे बांधव आहेत. माझ्या शेतीवर माझे प्रेम आहे. माझ्या शेतातील समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या पिकांचा मला अभिमान आहे. त्या पिकांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करेन, मी माझ्या शेतीचा, निसर्गाचा, आणि मित्रकिटकांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन. माझी शेती आणि शेतकरी बांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.

२. **कार्यक्रमाची रूपरेषा:** प्रवर्तकाने आजच्या शेतीशाळेत शेतकऱ्यांसाठी तो कुठले कार्यक्रम घेणार आहे ते सांगावे.

३. **मागोवा:** याद्वारे मागील शेतीशाळेत कोणते कार्यक्रम घेतले गेले हे शेतकऱ्यांनी प्रवर्तकाला सांगावे. मागोव्यामुळे शेतकऱ्यांच्या स्मरणशक्तीला चालना मिळते.

४. **पीक परीसंस्था निरीक्षणे कीटक संग्रहालय तयार करणे: यामध्ये** शेतीशाळा प्लॉट (ICM Plot) व नियंत्रीत प्लॉट (Farmers Practice Plot) मधील पिकाची विविध कायीक निरीक्षणे उदा. फांदया, फुले, फळे इ. तसेच विविध शत्रूकिडी व मित्र कीटक व त्यांची संख्या, जमिनीतील ओलावा, तणांची घनता, हवेतील आर्द्रता (कमी / मध्यम / जास्त) सुर्यप्रकाश, पाउसमान या सर्व निरीक्षणांचा समावेश होतो. पीक परीसंस्था निरीक्षणे नेहमी सकाळी ८ ते ९ वाजेपर्यत घ्यावीत. जास्त उशीर झाल्यास मित्र कीटक / शत्रूकिडींची योग्य संख्या आपणास मिळू शकत नाही. **शेतीशाळेत पिक परीसंस्थेची निरीक्षणे घेताना आढळून आलेल्या कीड, रोग व मित्र किटक पकडून त्यांच्या जीवन क्रमाचे हरबॅरिअम शिट (herbarium sheet) वर संग्रहण करावे जेणेकरून शेतक-यांना कीड, रोग, मित्रकीटक यांच्या विविध जीवनक्रमाचे आकलन होईल.**

५. **पीक परीसंस्था निरीक्षणांचे चित्रीकरण, सादरीकरण व चर्चा:** शेतीशाळा प्लॉट (ICM Plot) व नियंत्रीत प्लॉट (Farmers Practice Plot) मध्ये निरीक्षणे घेतल्यानंतर ठरवलेल्या जागी शेतकऱ्यांनी एकत्र जमावे व घेतलेल्या निरीक्षणांचे चित्रीकरण ड्राईगं शीटवर स्केचपेनच्या साहाय्याने करावे. नंतर प्रत्येक गटातील एका शेतकऱ्याने त्याच्या गटाचा प्रतिनिधी म्हणून त्या निरीक्षणांचे सादरीकरण करावे. शेतीशाळा प्लॉट (ICM Plot) व नियंत्रीत प्लॉट (Farmers Practice Plot) च्या निरीक्षंणांचे सादरीकरण झाल्यावर त्यासंबधी सर्व शेतकऱ्यांनी चर्चा करावी. शेतीशाळा प्लॉट (ICM Plot) मध्ये मित्र किटक व शत्रूकिडी यांचे प्रमाण, जमिनीतील ओलावा, तणांचे प्रमाण, खत व्यवस्थापन याबाबत योग्य तो निर्णय सर्वानुमते घ्यावा. सुविधाकार शेतकऱ्याने या निर्णयाची अंमलबजावणी शेतीशाळा प्लॉट (ICM Plot) मध्ये तातडीने करावी.







६. **समुह गुणदर्शन:** समुह गुणदर्शन म्हणजे विविध मनोरंजनात्मक सांघीक खेळ. शेतीशाळेमध्ये समुह गुणदर्शनाचे अतिशय महत्त्व आहे. गट क्रीयाशील व एकजूट राहण्यासाठी त्याचा उपयोग होतो.

७. **विशेष अभ्यास/ लघू अभ्यास / लघू प्रयोग:** विशेष अभ्यास किंवा लघू अभ्यास/ लघू प्रयोगा साठी एक ते दिड तास द्यायला हवा. विविध शत्रूकिडी वा मित्र किटकांवरील लघू अभ्यास घ्यायचे असतील तर ते सकाळी पीक परीसंस्था निरीक्षणे घेतल्यानंतर लगेच घ्यावीत. अशावेळी पीक परीसंस्था निरीक्षणांचे चित्रीकरण व सादरीकरण या ठिकाणी लघू अभ्यास/ लघू प्रयोगा व लघू अभ्यास/ लघू प्रयोगाच्या जागी चित्रीकरण व सादरीकरण असा बदल कार्यक्रमात करावा लागेल याची प्रवर्तकाने नोंद घ्यावी. लघू अभ्यास व लघू प्रयोग ठरविलेल्या वेळीच घ्यावेत.

८. **मुल्यमापन:** याद्वारे प्रवर्तकाला त्याने शेतीशाळेत घेतलेल्या कार्यक्रमाचे मुल्यमापन करता येते. शेतकऱ्यांच्या गरजा काय आहेत ? त्यांची इच्छा काय आहे? त्यांना पीक उत्पादनाच्या कुठल्या अवस्थेत अडचण येते? या सर्व प्रश्नांचे उत्तर त्यांना मुल्यामापनाद्वारे मिळत असते. त्यामुळे शेतीशाळेत मुल्यमापनाला एक आगळेवेगळे महत्व असते. उदाहरण म्हणून खाली मुल्यमापनाचा एक नमुना पहावा.

| **कार्यक्रमाचे नाव** | **चांगला मुद्दा** | **सुधारणा** |
|---|---|---|
| १) पीक परीसंस्था निरीक्षणे | मित्र किड व शत्रु किडींची ओळख झाली | निरीक्षणे घेण्यासाठी पट्टीचा वापर करायला हवा |
| २) पीक परीसंस्था निरीक्षणांचे चित्रीकरण, सादरीकरण व चर्चा. | मित्र किटक व शत्रूकिडींच्या प्रमाणावरून फवारणी करावी की नाही हे समजले. | पेन्सील ऐवजी स्केचपेनचा वापर करायला हवा |
| ३) समुह गुणदर्शन | सांघिक एकजूट वाढण्यास मदत झाली | शेतकऱ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग घ्यायला हवा |

**समारोप: पुढील शेतीशाळेसाठीचे नियोजन व त्याकरीता सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करून आयसीएम टाळीद्वारे शेतीशाळेचा समारोप करावा.**

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

## कापूस शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची,घेर,फळ फांद्या व वाढ फांद्यांची संख्या, पाते, फुले, बोंडे, गळालेल्या बोंडांची संख्या, बोंडअळ्यांमुळे प्रादुर्भावग्रस्त बोंडे, मित्रकिटक व शत्रू किडींची संख्या, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, हवामान, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** गुणाकाराच्या फुली प्रमाणे (X) शेताच्या प्रत्येक कर्णावरील दहा झाडांची निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०६ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | पेरणीपूर्व | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व कापूस उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी<br>४. लघू प्रयोग: बियाणे उगवण क्षमता चाचणी, बिजप्रक्रीया<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | पेरणी व रोपावस्था | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. विशेष विषय: विविध पिकांवर आढळलेल्या नवीन लष्करी अळीचे व्यवस्थापन<br>५. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे.<br>६. कापूस पीक परिसंस्था (CESA) संकल्पना माहीती<br>७. कापूस पीक परीसंस्था निरीक्षणे (Cotton Ecosystem Analysis-CESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष. |
| ३ | शाखीय वाढ | १. कापूस पीक परीसंस्था निरीक्षणे (CESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. लघू अभ्यास: ढालकिडा (LBB) व क्रायसोपा<br>३. विशेष विषय: कामगंध सापळे उपयोग व व्यवस्थापन, विविध वनस्पतीजन्य किटकनाशके<br>४. विशेष विषय: कपाशीवरील विविध रोग व त्यांचे व्यवस्थापन<br>५. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे<br>६. लघू अभ्यास: रस शोषणाऱ्या किडी |
| ४ | फुले लागणे | १. कापूस पीक परीसंस्था निरीक्षणे (CESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी<br>३. लघू प्रयोग: पिट फॉल ट्रॅप लावणे<br>४. विशेष विषय: एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक तण व्यवस्थापन<br>५. विशेष विषय: मूग व उडीद पिकावर लिफ मोझॅक (Leaf Mosaic) व लिफ क्रिंकल (Leaf |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| | | Crincle) रोगांची माहिती.<br>६. विशेष विषय: विविध पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन |
| ५ | **बोंडे लागण्याची अवस्था** | १. कापूस पीक परीसंस्था निरीक्षणे (CESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. लघू प्रयोग: पिट फॉल ट्रॅप निरीक्षणांचे एकत्रिकरण, चर्चा व निष्कर्ष<br>३. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षिक वापर व मानवी जीवनावर होणारे परिणाम<br>४. विशेष विषय: कापूस बोंडसड व जास्त पावसाच्या वेळी घ्यावयाची काळजी.<br>५. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान माहीती, कापूस फरदड टाळणे व कापूस हंगाम वेळेवर समाप्त करणे<br>६. लघू अभ्यास: गुलाबी बोंडअळी व व्यवस्थापन |
| ६ | **पक्वता, तोडणी व काढणी पश्चात** | १. कापूस पीक परीसंस्था निरीक्षणे (CESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष<br>२. पीक कापणी प्रयोग<br>३. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>४. बंद पेटी चाचणी<br>५. प्रक्षेत्र दिन<br>६. कापूस उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>७. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>८. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| **कापूस शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा** | | |
|---|---|---|
| **वर्ग क्र.** | **शेतीशाळा वर्गाचा महिना** | **हवामान प्रमाणभूत आठवडा** |
| १ | मे | आठवडा क्र. २० (१४ ते २० मे) |
| २ | जून | आठवडा क्र. २४ (११ ते १७ जून) |
| ३ | ऑगस्ट | आठवडा क्र. ३२ (६ ते १२ ऑगस्ट) |
| ४ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३७ (१० ते १६ सप्टेंबर) |
| ५ | ऑक्टोबर | आठवडा क्र.४३ (२२ ते २८ ऑक्टोबर) |
| ६ | नोव्हेंबर | आठवडा क्र.४८ (२६ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

**क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा**

**भात शेतीशाळा वर्गनिहाय विषय**

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, चुडातील फुटव्यांची संख्या, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, ऊंदरांमुळे झालेले नुकसान, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, पीक वाढीची आवस्था, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** निरिक्षणसाठी शेताच्या कोपऱ्यातून प्रवेश करुन शेताच्या दोन्ही कर्णावरील (शेताच्या बांधापासून फुट आतील भागातील) १ वर्ग मीटर क्षेत्राची ५ ठिकाणी निवड करुन त्या प्रत्येक वर्ग मीटरमधील चार चुडांवरील निरीक्षणे नोंदवावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०६ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | पेरणीपूर्व | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील भात उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व भात उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी.<br>४. लघू प्रयोग: बियाणे उगवण क्षमता चाचणी, बिजप्रक्रीया<br>५. विशेष विषय: भात रोपवाटीका तयार करणे<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | पेरणी, रोपवाटिका व रोपावस्था | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. भात रानबांधणी, पुर्नलावणी, रोपप्रक्रीया<br>५. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे.<br>५. महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग<br>६. लघू अभ्यास: पिवळा खोडकिडा, कातीण (Spider) |
| ३ | फुटवे अवस्था | १. भात पीक परिसंस्था (RESA) संकल्पना माहीती<br>२. भात पीक परीसंस्था निरीक्षणे (Rice Ecosystem Analysis-RESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. लघू अभ्यास: विविध मित्रकिटक व त्यांचे भात शेतीतील महत्व<br>४. विशेष विषय: भातावरील विविध रोग व त्यांचे व्यवस्थापन<br>५. विशेष विषय: एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन |
| ४ | फुरोलावस्था | १. भात पीक परीसंस्था निरीक्षणे (RESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. लघू अभ्यास: निळे भुंगेरे, तुडतुडे, तपकिरी तुडतुडे<br>३. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी<br>४. विशेष विषय: पाणी व्यवस्थापन व आंबा/काजू/संत्री पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन<br>५. विशेष विषय: कामगंध सापळे उपयोग व व्यवस्थापन |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| ५ | **दाणे भरण्याची अवस्था** | १. भात पीक परीसंस्था निरीक्षणे (RESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. लघू अभ्यास: ऊंदीर<br>३. विशेष विषय: विविध वनस्पतीजन्य किटकनाशके<br>४. विशेष विषय: विविध पिकांवर आढळून येत असलेल्या नवीन लष्करी अळीचे व्यवस्थापन<br>५. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षिक वापर व किटकनाशकांचा मानवी जीवनावर होणारे परिणाम |
| ६ | **पक्वता, काढणी व काढणी पश्चात** | १. भात पीक परीसंस्था निरीक्षणे (RESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष<br>२. पीक कापणी प्रयोग<br>३. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान माहीती<br>४. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>५. बंद पेटी चाचणी<br>६. प्रक्षेत्र दिन<br>७. भात उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>८. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>९. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| **भात शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा** | | |
|---|---|---|
| **वर्ग क्र.** | **शेतीशाळा वर्गाचा महिना** | **हवामान प्रमाणभूत आठवडा** |
| १ | मे | आठवडा क्र. २० (१४ ते २० मे) |
| २ | जून | आठवडा क्र. २४ (११ ते १७ जून) |
| ३ | ऑगस्ट | आठवडा क्र. ३२ (६ ते १२ ऑगस्ट) |
| ४ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३७ (१० सप्टेंबर ते १६ सप्टेंबर) |
| ५ | ऑक्टोबर | आठवडा क्र. ४१ (०८ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर) |
| ६ | नोव्हेंबर | आठवडा क्र. ४६ (१२ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

## सोयाबीन शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, शेंगा संख्या, किडलेल्या शेंगा, रोपमर, मर, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, पीक वाढीची आवस्था, हवामान, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** निवडलेल्या शेतातील मोघमपणे पाच ठिकाणे (शेताच्या मध्यभागातील एक व चार कोपऱ्यांच्या आतील भागातील चार अशी एकूण पाच ठिकाणे) निवडावीत. त्या प्रत्येक ठिकाणची दहा झाडे निवडून निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०५ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | पेरणीपूर्व | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व सोयाबीन उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी,<br>४. लघु प्रयोग: बिजप्रक्रीया, बियाणे उगवण क्षमता चाचणी.<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | पेरणी व रोपावस्था | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे.<br>५. सोयाबीन पीक परिसंस्था (SESA) संकल्पना माहीती<br>६. सोयाबीन पीक परीसंस्था निरीक्षणे (Soybean Ecosystem Analysis-SESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>७. विशेष विषय: आंतरपिके, तूर पिकावरील कीड रोगांचे व्यवस्थापन. |
| ३ | शाखीय वाढ व फुलोरावस्था | १. सोयाबीन पीक परीसंस्था निरीक्षणे (SESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: विविध पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन<br>३. विशेष विषय: एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक तण व्यवस्थापन<br>४. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी<br>५. लघू अभ्यास: खोडमाशी, चक्रीभुंगा, तंबाखुवरील पाने खाणारी अळी व विविध मित्रकीटक<br>६. विशेष विषय: कामगंध सापळे उपयोग व व्यवस्थापन |
| ४ | शेंगा लागणे व पक्वता | १. सोयाबीन पीक परीसंस्था निरीक्षणे (SESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष<br>२. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षीक वापर व किटकनाशकांचा मानवी जीवनावर होणारे परिणाम |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| | | ३. विशेष विषय: जास्त /खंडीत पावसाच्या वेळी घ्यावयाची काळजी<br>४. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत, निंबोळी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे<br>५. लघू प्रयोग: बिजोत्पादन<br>६. पीक कापणी प्रयोग<br>७. बंद पेटी चाचणी |
| **५** | **काढणी पश्चात** | १. प्रक्षेत्र दिन<br>२. सोयाबीन उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>३. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान व संवर्धित शेती/शून्य मशागत<br>४. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>५. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>६. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| **सोयाबीन शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा** | | |
|---|---|---|
| **वर्ग क्र.** | **शेतीशाळा वर्गाचा महिना** | **हवामान प्रमाणभूत आठवडा** |
| १ | मे | आठवडा क्र. २० (१४ मे ते २० मे) |
| २ | जून | आठवडा क्र. २४ (११ ते १७ जून) |
| ३ | जुलै | आठवडा क्र. ३० (२३ जुलै ते २९ जुलै) |
| ४ | ऑगस्ट | आठवडा क्र. ३४ (२० ऑगस्ट ते २६ ऑगस्ट) |
| ५ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३९ (२४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

## खरीप मका शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, रोपमर, मर, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, किडग्रस्त झाडे, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, हवामान, पीक वाढीची आवस्था, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** निवडलेल्या शेतातील मोघमपणे पाच ठिकाणे (शेताच्या मध्यभागातील एक व चार कोपऱ्यांच्या आतील भागातील चार अशी एकूण पाच ठिकाणे) निवडावीत. त्या प्रत्येक ठिकाणची दहा झाडे निवडून निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०५ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | **पेरणी पूर्व** | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील मका उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व मका उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी,<br>४. लघु प्रयोग: बिजप्रक्रीया<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | **पेरणी** | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे<br>५. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे. |
| ३ | **रोपावस्था ते पोंगावस्था** लवकर ते ) (उशिरा | १. मका पीक परिसंस्था (MESA) संकल्पना माहीती<br>२. मका पीक परीसंस्था निरीक्षणे (Maize Ecosystem Analysis-MESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. लघू अभ्यास: खोडकिडा, खोडमाशी, नवीन लष्करी अळी (फॉल आर्मीवर्म)<br>४. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी<br>५. विशेष विषय: कामगंध सापळे उपयोग व व्यवस्थापन |
| ४ | **गोंडा ते रेशीमवस्था** | १. मका पीक परीसंस्था निरीक्षणे (MESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: एकात्मिक तण व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन<br>३. विशेष विषय: विविध पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन, विविध वनस्पतीजन्य किटकनाशके<br>४. लघू अभ्यास: ढालकिडा (LBB) व क्रायसोपा<br>५. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षीक वापर व किटकनाशकांचा मानवी जीवनावर होणारे परिणाम |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| ५ | **कणीस पक्वता, काढणी ते काढणी पश्चात** | १. मका पीक परीसंस्था निरीक्षणे (MESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष<br>२. पीक कापणी प्रयोग<br>३. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान<br>४. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>५. बंद पेटी चाचणी<br>६. प्रक्षेत्र दिन<br>७. मका उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>८. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>९. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

**खरीप मका शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा**

| वर्ग क्र. | शेतीशाळा वर्गाचा महिना | हवामान प्रमाणभूत आठवडा |
|---|---|---|
| १ | मे | आठवडा क्र. २० (१४ मे ते २० मे) |
| २ | जून | आठवडा क्र. २३ (०४ जून ते १० जून) |
| ३ | जुलै | आठवडा क्र. २९ (१६ जुलै ते २२ जुलै) |
| ४ | ऑगस्ट | आठवडा क्र. ३३ (१३ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट) |
| ५ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३९ (२४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

## रब्बी मका शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, रोपमर, मर, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, किडग्रस्त झाडे, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, हवामान, पीक वाढीची आवस्था, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** निवडलेल्या शेतातील मोघमपणे पाच ठिकाणे (शेताच्या मध्यभागातील एक व चार कोपऱ्यांच्या आतील भागातील चार अशी एकूण पाच ठिकाणे) निवडावीत. त्या प्रत्येक ठिकाणची दहा झाडे निवडून निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०५ शेतीशाळा शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | पेरणी पूर्व | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील मका उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व मका उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी,<br>४. लघु प्रयोग: बिजप्रक्रीया<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | पेरणी | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत, निंबोळी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे<br>५. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे. |
| ३ | **रोपावस्था ते पोंगावस्था** लवकर ते ) (उशिरा | १. मका पीक परिसंस्था (MESA) संकल्पना माहीती<br>२. मका पीक परीसंस्था निरीक्षणे (Maize Ecosystem Analysis-MESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. लघू अभ्यास: खोडकिडा, खोडमाशी, नवीन लष्करी अळी (फॉल आर्मीवर्म)<br>४. विशेष विषय: कामगंध सापळे उपयोग व व्यवस्थापन, विविध पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन<br>५. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी |
| ४ | गोंडा ते रेशीमवस्था | १. मका पीक परीसंस्था निरीक्षणे (MESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: एकात्मिक तण व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन<br>३. लघू अभ्यास: ढालकिडा (LBB) व क्रायसोपा<br>४. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षीक वापर व मानवी जीवनावर होणारे परिणाम |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| | | ५. लघू प्रयोग: बिजोत्पादन |
| **५** | **कणीस पक्वता, काढणी ते काढणी पश्चात** | १. मका पीक परीसंस्था निरीक्षणे (MESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष<br>२. पीक कापणी प्रयोग<br>३. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान<br>४. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>५. बंद पेटी चाचणी<br>६. प्रक्षेत्र दिन<br>७. मका उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>८. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>९. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| रब्बी मका शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा | | |
|---|---|---|
| **वर्ग क्र.** | **शेतीशाळा वर्गाचा महिना** | **हवामान प्रमाणभूत आठवडा** |
| १ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३९ (२४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर) |
| २ | ऑक्टोबर | आठवडा क्र. ४२ (१५ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर) |
| ३ | नोव्हेंबर | आठवडा क्र. ४७ (१९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर) |
| ४ | डिसेंबर | आठवडा क्र. ५० (१० डिसेंबर ते १६ डिसेंबर) |
| ५ | जानेवारी | आठवडा क्र. ०३ (१५ जानेवारी ते २१ जानेवारी) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

## रब्बी ज्वारी शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, रोपमर, मर, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, किडग्रस्त झाडे, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, पीक वाढीची आवस्था, हवामान, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** निवडलेल्या शेतातील मोघमपणे पाच ठिकाणे (शेताच्या मध्यभागातील एक व चार कोपऱ्यांच्या आतील भागातील चार अशी एकूण पाच ठिकाणे) निवडावीत. त्या प्रत्येक ठिकाणची दहा झाडे निवडून निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०५ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | **पेरणी पूर्व** | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व ज्वारी उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी<br>४. लघु प्रयोग: बिजप्रक्रीया<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | **पेरणी** | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे.<br>५. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत, निंबोळी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे |
| ३ | **रोपावस्था ते पोंगावस्था** लवकर ते ) (उशिरा | १. ज्वारी पीक परिसंस्था (SESA) संकल्पना माहीती<br>२. ज्वारी पीक परीसंस्था निरीक्षणे (Sorghum Ecosystem Analysis-SESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. लघू अभ्यास: खोडमाशी व खोडकीड, नवीन लष्करी अळी (फॉल आर्मीवर्म)<br>४. विशेष विषय: कामगंध सापळे उपयोग व व्यवस्थापन, विविध पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन<br>५. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी |
| ४ | **कणीस लागणीची अवस्था** | १. ज्वारी पीक परीसंस्था निरीक्षणे (SESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: एकात्मिक तण व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन व जास्त /खंडीत पावसाच्या वेळी घ्यावयाची काळजी.<br>३. लघू अभ्यास: विविध मित्रकीटक<br>४. लघू प्रयोग: बिजोत्पादन |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| **५** | **कणीस पक्वता, काढणी ते काढणी पश्चात** | १. ज्वारी पीक परीसंस्था निरीक्षणे (SESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: किटकनाशकांचा वार्षीक वापर व मानवी जीवनावर होणारे परिणाम<br>३. पीक कापणी प्रयोग<br>४. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान<br>५. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>६. बंद पेटी चाचणी<br>७. प्रक्षेत्र दिन<br>८. ज्वारी उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>९. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>१०. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

**रब्बी ज्वारी शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा**

| वर्ग क्र. | शेतीशाळा वर्गाचा महिना | हवामान प्रमाणभूत आठवडा |
|---|---|---|
| १ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३९ (२४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर) |
| २ | ऑक्टोबर | आठवडा क्र. ४२ (१५ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर) |
| ३ | नोव्हेंबर | आठवडा क्र. ४७ (१९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर) |
| ४ | डिसेंबर | आठवडा क्र. ५० (१० डिसेंबर ते १६ डिसेंबर) |
| ५ | जानेवारी | आठवडा क्र. ०३ (१५ जानेवारी ते २१ जानेवारी) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

### क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

### तूर शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, फांद्यांची संख्या, रोपमर, मर, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, किडलेल्या शेंगा, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, पीक वाढीची आवस्था, हवामान, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** गुणाकाराच्या फुली प्रमाणे (X) शेताच्या प्रत्येक कर्णावरील दहा झाडांची निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०६ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | पेरणीपूर्व | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील तूर उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व तूर उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी,<br>४. लघु प्रयोग: बिजप्रक्रीया.<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | पेरणी व रोपावस्था | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. विशेष विषय: तूर पिकातील आंतरपिकांचे नियोजन<br>५. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे.<br>६. लघू अभ्यास: मर रोग |
| ३ | शाखीय वाढ | १. तूर पीक परिसंस्था (TESA) संकल्पना माहीती<br>२. तूर पीक परीसंस्था निरीक्षणे (Tur Ecosystem Analysis-TESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. विशेष विषय: विविध वनस्पतीजन्य किटकनाशके<br>४. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे<br>५. लघू अभ्यास: विविध पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन व विविध मित्रकीटक |
| ४ | फुलोरा / फुलांची अवस्था | १. तूर पीक परीसंस्था निरीक्षणे (TESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: विविध पिकांवरील नवीन लष्करी अळी (फॉल आर्मीवर्म) व्यवस्थापन<br>३. विशेष विषय: एकात्मिक तण व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन<br>४. लघू अभ्यास: शेंगा पोखरणारी अळी व इतर शेंगांचे नुकसान करणाऱ्या किडी<br>५. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी |
| ५ | फुलांची अवस्था व | १. तूर पीक परीसंस्था निरीक्षणे (TESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: जास्त /खंडीत पावसाच्या वेळी घ्यावयाची काळजी व पाणी व्यवस्थापन<br>३. विशेष विषय: मूग व उडीद पिकावर लिफ मोझॅक (Leaf Mosaic) व लिफ क्रिंकल |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| | शेंगा अवस्था | (Leaf Crincle) रोगांची माहीती<br>४. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षीक वापर व मानवी जीवनावर होणारे परिणाम |
| ६ | पक्वता व काढणी पश्चात | १. तूर पीक परीसंस्था निरीक्षणे (TESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष<br>२. पीक कापणी प्रयोग<br>३. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान<br>४. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>५. बंद पेटी चाचणी<br>६. प्रक्षेत्र दिन<br>७. तूर उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>८. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>९. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| तूर शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा | | |
|---|---|---|
| **वर्ग क्र.** | **शेतीशाळा वर्गाचा महिना** | **हवामान प्रमाणभूत आठवडा** |
| १ | मे | आठवडा क्र. २० (१४ ते २० मे) |
| २ | जून | आठवडा क्र. २४ (११ ते १७ जून) |
| ३ | ऑगस्ट | आठवडा क्र. ३२ (६ ते १२ ऑगस्ट) |
| ४ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३७ (१० ते १६ सप्टेंबर) |
| ५ | ऑक्टोबर | आठवडा क्र.४३ (२२ ते २८ ऑक्टोबर) |
| ६ | नोव्हेंबर | आठवडा क्र.४८ (२६ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

## ऊस शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** एक मीटर रांगेतील ऊस झाडांची संख्या, ऊंची, कांड्यांची संख्या, प्रादुर्भावग्रस्त झाडे, ऊंदरांमुळे नुकसानग्रस्त झाडे, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, जमिनीतील ओलावा, हवामान, पीक परीस्थिती, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** गुणाकाराच्या फुली प्रमाणे (X) शेताच्या प्रत्येक कर्णावरील दहा झाडांची निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०६ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | **लागवडीपूर्व** | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व ऊस उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: हुमणी व्यवस्थापन, ईपीएन कल्चर<br>४. विशेष विषय: लागवडपूर्व मशागत रान बांधणी, माती परीक्षण, हिरवळीची खते, बेणे निवड.<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्याच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | **लागवड/पेरणी व उगवण** | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: मृद परीक्षण, जमिन आरोग्य पत्रिकेनुसार एकात्मिक खत/अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे, पाणी व्यवस्थापन, सुक्ष्म सिंचन<br>४. विशेष विषय: बीडी कंपोस्ट, एस ९ कल्चर<br>५. लघू प्रयोग: बिजप्रक्रीया /जिवाणू खते, दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत, निंबोळी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे |
| ३ | **फुटवे फुटणे** | १. ऊस पीक परिसंस्था (SESA) संकल्पना माहीती<br>२. ऊस पीक परीसंस्था निरीक्षणे, चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. विशेष विषय: लागवड पद्धती तसेच खते, बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी<br>४. विशेष विषय: विविध पिकांवर आढळून येत असलेल्या नवीन लष्करी अळीचे व्यवस्थापन<br>५. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी |
| ४ | **कांडी सुटणे** | १. ऊस पीक परिसंस्था (SESA) संकल्पना माहीती<br>२. ऊस पीक परीसंस्था निरीक्षणे, चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. विशेष विषय: एकात्मिक तण व्यवस्थापन व ऊसातील आंतरपिकांचे नियोजन<br>४. विशेष विषय: ऊस बेणेमळा व्यवस्थापन<br>५. लघू अभ्यास: खोडकिडा<br>६. विशेष विषय: पाणी व्यवस्थापन, जास्त/कमी पावसाच्या वेळी घ्यावयाची काळजी. |
| ५ | **जोमदार वाढ** | १. ऊस पीक परीसंस्था निरीक्षणे, चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: क्षारयुक्त व चोपण जमिनीतील ऊस व्यवस्थापन<br>३. विशेष विषय: खोडवा व पाचट व्यवस्थापन<br>४. विशेष विषय: ऊसावरील विविध किडींचे व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| | | ५. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षिक वापर व मानवी जीवनावर होणारे परिणाम, कीटनाशकांचा सुरक्षीत वापर |
| ६ | **पक्वता व काढणी पश्चात** | १. ऊस पीक परीसंस्था निरीक्षणे (SESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: पाचटापासून गांडूळ खत तयार करणे<br>३. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>४. बंद पेटी चाचणी<br>५. प्रक्षेत्र दिन<br>६. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>७. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| वर्ग क्र. | ऊस शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आडसाली | | पूर्वहंगामी | | सुरु | |
| | शेतीशाळा वर्गाचा महिना | हवामान प्रमाणभूत आठवडा | शेतीशाळा वर्गाचा महिना | हवामान प्रमाणभूत आठवडा | शेतीशाळा वर्गाचा महिना | हवामान प्रमाणभूत आठवडा |
| १ | मे | आठवडा क्र. २२ (२८मे ते ०३ जून) | सप्टेंबर | आठवडा क्र. ३७ (१० ते १६ सप्टेंबर) | नोव्हेंबर | आठवडा क्र. ४८ (२६ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर) |
| २ | जुलै | आठवडा क्र. ३१ (३० जुलै ते ०५ ऑगस्ट) | ऑक्टोबर | आठवडा क्र. ४४ (२९ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर) | जानेवारी | आठवडा क्र. ०१ (०१ ते ०७ जानेवारी) |
| ३ | ऑक्टोबर | आठवडा क्र. ४२ (१५ ते २१ ऑक्टोबर) | फेब्रुवारी | आठवडा क्र. ०७ (१२ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी) | एप्रिल | आठवडा क्र. १५ (०९ एप्रिल ते १५ एप्रिल) |
| ४ | जानेवारी | आठवडा क्र. ०१ (०१ ते ०७ जानेवारी) | एप्रिल | आठवडा क्र. १८ (३० एप्रिल ते ०६ मे) | जून | आठवडा क्र. २४ (११ जून ते १७ जून) |
| ५ | मार्च | आठवडा क्र. १० (०५ ते ११ मार्च) | जून | आठवडा क्र. २५ (१८ ते २४ जून) | जुलै | आठवडा क्र. ३० (२३ जुलै ते २९ जुलै) |
| ६ | जून | आठवडा क्र. २६ (२५ जून ते ०१ जुलै) | ऑगस्ट | आठवडा क्र. ३५ (२७ ऑगस्ट ते ०२ सप्टेंबर) | सप्टेंबर | आठवडा क्र. ३७ (१० ते १६ सप्टेंबर) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

## क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा

## हरभरा शेतीशाळा वर्गनिहाय विषय

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, रोपमर, मर, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, हवामान, पीक वाढीची आवस्था, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** निवडलेल्या शेतातील मोघमपणे पाच ठिकाणे (शेताच्या मध्यभागातील एक व चार कोपऱ्यांच्या आतील भागातील चार अशी एकूण पाच ठिकाणे) निवडावीत. त्या प्रत्येक ठिकाणची दहा झाडे निवडून निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०५ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | पेरणीपूर्व | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व हरभरा उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी<br>४. लघु प्रयोग: बिजप्रक्रीया<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | पेरणी व रोपावस्था | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे.<br>५. लघू अभ्यास: मर रोग<br>६. विशेष विषय: हरभऱ्यावरील विविध रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन |
| ३ | शाखीय वाढ व फुलोरा/फुलांची अवस्था | १. हरभरा पीक परिसंस्था (GESA) संकल्पना माहीती<br>२. हरभरा पीक परीसंस्था निरीक्षणे (Gram Ecosystem Analysis-GESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>३. विशेष विषय: कामगंध सापळे उपयोग व व्यवस्थापन<br>४. विशेष विषय: एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन<br>५. लघू अभ्यास: घाटेअळी व मित्रकिटकांची ओळख<br>६. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी |
| ४ | घाटे लागणी | १. हरभरा पीक परीसंस्था निरीक्षणे (GESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: विविध पिकांवरील कीड रोगांचे व्यवस्थापन<br>३. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत, निंबोळी अर्क तयार करण्याचे |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| | | प्रात्यक्षिक दाखविणे<br>४. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षीक वापर व मानवी जीवनावर होणारे परिणाम |
| ५ | **पक्वता व काढणी पश्चात** | १. हरभरा पीक परीसंस्था निरीक्षणे (GESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष<br>२. पीक कापणी प्रयोग<br>३. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान (डाळ प्रक्रिया)<br>४. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>५. बंद पेटी चाचणी<br>६. प्रक्षेत्र दिन<br>७. हरभरा डाळ प्रक्रिया उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>८. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>९. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| हरभरा शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा | | |
|---|---|---|
| **वर्ग क्र.** | **शेतीशाळा वर्गाचा महिना** | **हवामान प्रमाणभूत आठवडा** |
| १ | सप्टेंबर | आठवडा क्र. ३८ (१७ ते २३ सप्टेंबर) |
| २ | ऑक्टोबर | आठवडा क्र. ४२ (१५ ते २१ ऑक्टोबर) |
| ३ | नोव्हेंबर | आठवडा क्र. ४७ (१९ ते २५ नोव्हेंबर) |
| ४ | डिसेंबर | आठवडा क्र. ५२ (२४ ते ३१ डिसेंबर) |
| ५ | जानेवारी | आठवडा क्र. ०४ (२२ ते २८ जानेवारी) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.

**क्रॉपसॅप संलग्न शेतकऱ्यांची शेतीशाळा**

**मुग/उडीद शेतीशाळा वर्गनिहाय विषय**

**शेतीशाळेचा अभ्यासक्रम:**

**निरीक्षणे:** उंची, शेंगा संख्या, किडलेल्या शेंगा, रोपमर, मर, मित्रकिटक व शत्रु किडींची संख्या, जमिनीतील ओलावा, पीक परीस्थिती, पीक वाढीची आवस्था, हवामान, तणांची घनता इ.

**निरीक्षणे घेण्याची पध्दत:** निवडलेल्या शेतातील मोघमपणे पाच ठिकाणे (शेताच्या मध्यभागातील एक व चार कोपऱ्यांच्या आतील भागातील चार अशी एकूण पाच ठिकाणे) निवडावीत. त्या प्रत्येक ठिकाणची दहा झाडे निवडून निरीक्षणे घ्यावीत.

**अभ्यासक्रम: एकूण ०४ शेतीशाळा महत्वाच्या पिक वाढीच्या अवस्थेनुसार**

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| १ | पेरणीपूर्व | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या गावातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची सभा घेणे, या सभेत शेतीशाळेचा उद्देश व सोयाबीन उत्पादनात येणाऱ्या सर्वसाधारण अडचणी यावर चर्चा करणे.<br>२. २५ शेतकऱ्यांची निवड व त्यातून सुविधाकार शेतकऱ्याची निवड करणे.<br>३. विशेष विषय: बियाणे निवड, बियाणे, खते खरेदी करताना घ्यावयाची काळजी,<br>४. लघु प्रयोग: बिजप्रक्रीया<br>५. लघू अभ्यास: महिलांचा शेती विषयक निर्णय प्रकीया व प्रत्यक्ष कामातील सहभाग.<br>६. सुविधाकार शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रास भेट देणे. |
| २ | पेरणी व रोपावस्था | १. शेतीशाळेसाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचे पायाभूत सर्वेक्षण, गट निर्मिती करणे<br>२. बंद पेटी चाचणी<br>३. विशेष विषय: एकात्मिक पीक व्यवस्थापन संकल्पना व चर्चा, मृद परिक्षण, जमिन आरोग्य पत्रिका यावरुन खत व्यवस्थापन<br>४. बाजारमुल्य साखळी तयार करणेच्या दृष्टीने शेतकरी उत्पादक कंपनी व त्यांच्याकडून अपेक्षीत कार्य याबाबत चर्चा व नियोजन करणे.<br>५. मूग/उडीद पीक परिसंस्था (MESA/UESA) संकल्पना माहीती<br>६. मूग/उडीद पीक परीसंस्था निरीक्षणे (Mung/Udid Ecosystem Analysis-MESA/UESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>७. विशेष विषय: आंतरपिके, मूग व उडीद पिकावर लिफ मोझॅक (Leaf Mosaic) व लिफ क्रिंकल (Leaf Crincle) रोगांची माहीती.<br>८. लघू प्रयोग: दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत, निंबोळी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणे |
| ३ | फुलोरावस्था | १. मूग/उडीद पीक परीसंस्था निरीक्षणे (Mung/Udid Ecosystem Analysis-MESA/UESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. विशेष विषय: एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक तण व्यवस्थापन<br>३. लघू प्रयोग: जलधारण क्षमता चाचणी |

| वर्ग क्र. | पिक वाढीची अवस्था | विषय |
|---|---|---|
| | | ४. लघू अभ्यास: पाना फुलांची जाळी करणारी अळी, पाने व शेंगा खाणा-या अळ्या<br>५. विशेष विषय: जास्त /खंडीत पावसाच्या वेळी घ्यावयाची काळजी व पाणी व्यवस्थापन |
| ४ | **शेंगा लागणे, पक्वता व काढणी पश्चात** | १. मूग/उडीद पीक परीसंस्था निरीक्षणे (Mung/Udid Ecosystem Analysis-MESA/UESA), चित्रीकरण, सादरीकरण, चर्चा व निष्कर्ष.<br>२. लघू अभ्यास: किटकनाशकांचा वार्षीक वापर व किटकनाशकांचा मानवी जीवनावर होणारे परिणाम<br>३. पीक कापणी प्रयोग<br>४. बंद पेटी चाचणी<br>५. प्रक्षेत्र दिन<br>६. मूग/उडीद उद्योग संबंधीत कंपन्या व शेतकरी संवाद<br>७. विशेष विषय: काढणी पश्चात तंत्रज्ञान<br>८. लघू अभ्यास: उत्पादन खर्च व परतावा याचा ताळेबंद काढणे<br>९. प्रगतशिल शेतकरी/कृषि पुरस्कार प्राप्त शेतकरी अनुभव अदान-प्रदान<br>१०. शेतीपुरक व्यवसाय मार्गदर्शन |

| **मूग/उडीद शेतीशाळा वर्गाचा संभाव्य आराखडा** | | |
|---|---|---|
| **वर्ग क्र.** | **शेतीशाळा वर्गाचा महिना** | **हवामान प्रमाणभूत आठवडा** |
| १ | मे | आठवडा क्र. २० (१४ मे ते २० मे) |
| २ | जून | आठवडा क्र. २४ (११ जून ते १७ जून) |
| ३ | जुलै | आठवडा क्र. ३० (२३ जुलै ते २९ जुलै) |
| ४ | ऑगस्ट | आठवडा क्र. ३५ (२७ ऑगस्ट ते ०२ सप्टेंबर) |

- टीप : शेतीशाळा वर्गाचा कालावधी हा स्थानिक पिक वाढीच्या अवस्थेनुसार ठेवावा.